

# प्रहार करणारे देवदूत

एड्रियन एबेन्स

# प्रहार करणारे देवदूत

एड्रियन एबेन्स

Printed by

MARANATHA
MEDIA
maranathamedia.com

September 2025

ह्या पुस्तकाचे मराठी अनुवाद भाऊ जोएल एलिझाबेथ साळवी ह्यांनी केले आहे. तसेच पुनर्वाचनासाठी ताई सुनीता मोहिते ह्यांनी मदत केली आहे.

# सामग्री

प्रहार करणारे देवदूत........................................................................................4
बालाम.......................................................................................................4
आपण कसे वाचतो?...................................................................................... 11
एक नैसर्गिक प्रतिसाद.................................................................................... 12
ख्रिस्त आपला परिपूर्ण आदर्श.......................................................................... 14
नियमशास्त्र देवाच्या स्वभावाचे प्रतिबिंब..............................................................16
न्यायालयीन हत्या आणि खून यात फरक?..........................................................17
इस्राएलाची गणना..........................................................................................22
पापाला वाढू देणे............................................................................................23
साथरोग हा शत्रूचा ठसा आहे..........................................................................26
देवपुत्राची तलवार..........................................................................................27
अश्शूरच्या सैन्याचा नाश.................................................................................31
हेरोदाचा मृत्यू............................................................................................... 36
चांगल्या आणि वाईट देवदूतांची विध्वंसक शक्ती.................................................39
संदर्भात वाचन.............................................................................................. 40
मिसरमध्ये प्रथम जन्मलेल्यांचा नाश करणारा सैतान............................................ 42
यरीहोच्या भिंती.............................................................................................. 43

## प्रहार करणारे देवदूत

जर तुम्ही पवित्रशास्त्रात देवदूत आणि वध केले हे शब्द शोधायचा प्रयत्न केला, तर तुम्हाला चार बायबल कथा सापडतील:

१) गणना 22 बलाम आणि गाढव. बलामाने गाढवावर प्रहार केला, कारण त्याने देवदूताला पाहिले होते.

२) 2 शमुवेल 24 दावीदने इस्राएलाची गणना केली, आणि 70,000 लोकांना परमेश्वराच्या देवदूताने प्रहार करून ठार केले.

३) 2 राजे 19:35 आणि यशया 37:36 अश्शूरच्या सैन्यातील 1,85,000 पुरुषांवर परमेश्वराच्या देवदूताने प्रहार केला.

४) प्रेषितांची कृत्ये 12:24 परमेश्वराच्या देवदूताने हेरोदावर त्याच्या पापामुळे प्रहार केला.

## बलाम

पहिल्या कथेत देवदूताने कोणावरही प्रहार केला नाही; उलट बलामाने गाढवावर प्रहार केला, कारण ती देवदूताला पाहून थांबली होती. देवदूत तलवार घेऊन बलामाच्या समोर उभा राहिला आणि तो बलामाच्या विरोधात शत्रूसारखा उभा होता.

गणना 22:22-23 पण तो गेल्यामुळे देवाचा कोप भडकला आणि त्याला अडवण्यासाठी परमेश्वराचा दूत वाटेत त्याला आडवा आला. बलाम गाढवीवर बसलेला होता आणि बरोबर त्याचे दोन सेवक होते. परमेश्वराचा दूत उपसलेली तलवार हाती घेऊन वाटेत उभा असल्याचे त्या गाढवीने पाहिले, तेव्हा ती वाट सोडून शेतात शिरली; तिला पुन्हा वाटेवर आणण्यासाठी बलामाने तिला मारले.

बलामला आपल्या मार्गात देवदूत उभा आहे याची जाणीव नव्हती. जेव्हा गाढवी बाजूला वळली तेव्हा बलाम रागावला.

गणना 22:29 बलाम गाढवीला म्हणाला, “तू माझी चेष्टा केलीस; माझ्या हाती तलवार असती तर मी आताच तुला छाटून टाकले असते.”

बलाम असे सांगतो की जर त्याच्या हातात तलवार असती तर त्याने गाढवीला ठार केले असते. त्यानंतरच त्याचे डोळे उघडले आणि त्याने देवदूताला पाहिले, ज्याच्या हातात तलवार उपसलेली होती. “परमेश्वराचा देवदूत” हा शब्द बऱ्याच वेळा ख्रिस्ताला सूचित करतो (पाहा निर्गम 3:2; 3:14; 23:20; 32:34). आणि ख्रिस्त बलामाला म्हणतो...

गणना 22:33 (MARVBSI) “आणि मला पाहून ती गाढवी माझ्यासमोरून तीनदा बाजूला हटली; ती बाजूला हटली नसती तर खात्रीने आताच मी तुला मारून टाकले असते व तिला जिवंत ठेवले असते.”

या चित्रात आपण बलामविषयी एक महत्त्वाची तपशील पाहतो.

जेव्हा इस्राएलला शाप द्यायला बलामाला बोलावण्यात आले, तेव्हा त्याला तसे करायला परवानगी नव्हती; कारण परमेश्वराने म्हटले होते “त्याने याकोबात अधर्म पाहिला नाही; इस्राएलमध्ये त्याने अन्याय पाहिला नाही; परमेश्वर त्याचा देव त्याच्याबरोबर आहे, आणि त्याच्या मध्ये राजाचा जयघोष होतो.” परंतु बलाम, जो आधीच मोहाला शरण गेला होता, आता पूर्णपणे सैतानाचा दूत झाला; आणि देवाने त्याला थेट करू दिले नव्हते ते अप्रत्यक्षपणे साध्य करण्याचा त्याने निश्चय केला. {5T 598}

बलामला माहीत होते की त्याने हे काम करायला जाऊ नये. त्याने स्वतःला सैतानाचा पूर्ण दूत केले आणि देवदूताशी झालेल्या भेटीत बलामचा स्वभाव प्रकट झाला असा मनुष्य जो तलवारीने मारण्यासाठी सिद्ध होता. देवदूत “शत्रू” म्हणून प्रकट झाला; आणि हिब्रू भाषेत येथे “सैतान” असा शब्द वापरलेला आहे. तो हातात उपसलेली तलवार घेऊन उभा होता. अशा रीतीने ख्रिस्त बलामपुढे तसाच दिसला जसा बलाम स्वतः होता सैतानाच्या

आत्म्याने भरलेला, हृदयात खून करण्याची वृत्ती असलेला. हे स्पष्ट आहे की ख्रिस्त बलामला मारण्यासाठी नव्हता आलेला; कारण या भेटीनंतर त्याने बलामला पुढे जाऊन त्याला पाहिजे तसे करू दिले. ख्रिस्त त्याला सावध करण्यासाठी आणि नाशाकडे नेणाऱ्या त्याच्या मार्गास विरोध करण्यासाठी आला होता.

बलामचे जीवन वाचले ते त्या गरीब प्राण्यामुळे ज्याच्याशी त्याने इतक्या क्रूरतेने वागणूक केली होती. जो मनुष्य स्वतःला परमेश्वराचा संदेष्टा म्हणवून घेत होता, ज्याने जाहीर केले होते की त्याचे डोळे उघडले गेले आहेत आणि त्याने "सर्वशक्तिमानाचे दर्शन" पाहिले आहे, तो इतका लोभ आणि महत्त्वाकांक्षेने आंधळा झाला होता की देवदूत त्याच्या जनावराला दिसला, पण तो त्याला स्वतःला दिसला नाही. "या जगाचा देव अविश्वासूजणांची मने, आंधळीं करीत आहे." अशा रीतीने कितीजण आंधळे झाले आहेत! ते मनाई केलेल्या मार्गांनी धावत जातात, दैवी व्यवस्था मोडतात, आणि त्यांना हे कळत नाही की देव व त्याचे देवदूत त्यांच्याविरुद्ध उभे आहेत. बलामसारखेच ते त्या लोकांवर रागावतात जे त्यांच्या नाशाला थांबवू पाहतात. {PP 442.4}

ख्रिस्त बलामपुढे तसाच दिसला जसा बलाम स्वतः होता. हा प्रयत्न होता बलामाला स्वतःचा नाश करण्यापासून थांबविण्याचा. हीच ती प्रक्रिया आहे ज्यात व्यवस्था पापाला विपुल करते, जेणेकरून पश्चात्तापाद्वारे कृपा अधिकाधिक विपुल व्हावी. पण दुर्दैवाने बलामाने या प्रक्रियेतून पश्चात्ताप केला नाही. बलाम जे दुष्ट काम करीत होता त्यात ख्रिस्ताने यातना भोगल्या, आणि जेव्हा बलाम बंडखोर झाला, तेव्हा ख्रिस्त त्याचा शत्रू झाला.

यशया 63:9-10 "त्यांच्या सर्व दुःखाने तो दुःखी झाला, त्याची प्रत्यक्षता दर्शवणाऱ्या दिव्यदूताने त्यांचे तारण केले; त्याने आपल्या प्रीतीने व आपल्या करुणेने त्यांना उद्धरले; पूर्वीचे सर्व दिवस त्याने त्यांचे लालनपालन केले. तरी त्यांनी बंड केले व त्याच्या पवित्र आत्म्यास खिन्न केले; तेव्हा तो उलटला व त्यांचा शत्रू बनला, तो स्वत: त्यांच्याशी लढला."

हिब्रू भाषेत “शत्रू झाला" हा शब्द निफाल रूपात आहे, आणि या ठिकाणी त्याचा अर्थ आहे “वळविण्यात आले.” या संदर्भात ख्रिस्त बलामाच्या कृतींमुळे शत्रूसारखा दिसला. कारण बलाम देवाच्या वचनाने वागणारा नव्हता; तो फक्त ऐकणारा होता. त्यामुळे तो आरशात स्वतःचा नैसर्गिक चेहरा पाहणाऱ्या मनुष्याप्रमाणे होता.

याकोब 1:23 (MARVBSI) “कारण जर कोणी वचन नुसते ऐकून घेतो व त्याप्रमाणे आचरण करत नाही, तर तो आरशात आपले शारीरिक मुख पाहणाऱ्या माणसासारखा आहे;"

याची तुलना करता आपण पाहतो की जेव्हा ख्रिस्त तलवार उपसून यहोशवाला दिसला, तेव्हा त्याचा देखावा शत्रूसारखा नव्हता, परंतु तरीही ख्रिस्त यहोशवाप्रमाणेच एका सैनिकासारखा त्याला दिसला.

यहोशवा 5:13 (MARVBSI) यहोशवाने यरीहोजवळ असताना समोर पाहिले तो कोणी पुरुष आपल्या हाती उपसलेली तलवार घेऊन पुढे उभा आहे असे त्याच्या नजरेस पडले. यहोशवाने जवळ जाऊन विचारले, “तू आमच्या पक्षाचा की आमच्या वैऱ्यांच्या पक्षाचा?”

जेव्हा यहोशवा इस्राएलाच्या सैन्यापासून दूर जाऊन देवाची विशेष उपस्थिती मिळावी म्हणून ध्यान आणि प्रार्थना करीत होता, तेव्हा त्याने उंच बांध्याचा एक मनुष्य पाहिला, जो युद्धाचे वस्त्र घालून होता आणि त्याच्या हातात उपसलेली तलवार होती. यहोशवाने त्याला इस्राएलाच्या सैन्यातील कुणी म्हणून ओळखले नाही; पण त्याच्यात शत्रूप्रमाणे कोणताही देखावा नव्हता. आपल्या उत्कटतेने त्याने विचारले, “तू आमच्याबाजूने आहेस की आमच्या शत्रूंच्या?” त्याने उत्तर दिले: “नाही; पण आता मी परमेश्वराच्या सैन्याचा सेनापती म्हणून आलो आहे.” तेव्हा यहोशवा जमिनीवर तोंड घालून पडला आणि उपासना केली, आणि म्हणाला, “माझा स्वामी आपल्या दासाला काय सांगतो?” “परमेश्वराच्या सैन्याच्या सेनापतीने यहोशवाला सांगितले, ‘आपल्या पायातील जोडा काढून टाक; कारण ज्या ठिकाणी तू उभा आहेस ते पवित्र आहे.’ आणि यहोशवाने तसे केले.” {1SP 347.3}

ख्रिस्त बालाामाचा शत्रू म्हणून प्रकट झाला कारण बालाम ख्रिस्ताचा शत्रू होता. ख्रिस्त यहोशवाला शत्रू म्हणून दिसला नाही, कारण यहोशवा ख्रिस्ताचा शत्रू नव्हता. पण ख्रिस्ताने जेव्हा म्हटले की त्याने बालामाला ठार मारले असते, तेव्हा त्याचा अर्थ काय होता?

गणना 22:31-33 तेव्हा परमेश्वराने बलामाचे डोळे उघडले, आणि परमेश्वराचा दूत उपसलेली तलवार हाती घेऊन वाटेत उभा आहे हे पाहून बलामाने नमन करून लोटांगण घातले. 32परमेश्वराचा दूत त्याला म्हणाला, “तू तीन वेळा आपल्या गाढवीला का मारलेस? पाहा, तुला अडवण्यासाठी मी पुढे सरसावलो आहे, कारण तुझे आचरण मला विपरीत दिसते; 33आणि मला पाहून ती गाढवी माझ्यासमोरून तीनदा बाजूला हटली; ती बाजूला हटली नसती तर खात्रीने आताच मी तुला मारून टाकले असते व तिला जिवंत ठेवले असते.”

गाढवीला धोका जाणवला कारण तिने वाटेत ख्रिस्ताला उभे पाहिले. बालाामच्या कृतींमुळे ख्रिस्त त्याचा शत्रू ठरला, जेणेकरून त्याला नाशापासून वाचवता येईल. त्या बिचाऱ्या प्राण्याला काय घडत आहे याची खरी जाणीव बालाामपेक्षा अधिक झाली होती. हे अगदी पूरकाळाप्रमाणेच होते. जनावरांना निकट येणारा नाश लोकांपेक्षा जास्त जाणवत होता.

अनेक मूक्या प्राण्यांनी दाखवलेली बुध्दी मानवी बुध्दीच्या इतकी जवळ येते की ते एक गूढ आहे. जनावरे पाहतात, ऐकतात, प्रेम करतात, घाबरतात आणि दु:ख भोगतात. {MH 315.3}

त्या बिचाऱ्या गाढवीने किती यातना सोसल्या बालाामाच्या सैतानी रागाखाली, जेव्हा ती त्याला धोक्यापासून वाचवण्याचा प्रयत्न करत होती. गाढव बोलण्यात मूक होती, पण जाणिवा व भावनांमध्ये नाही. ती बालाामपेक्षा अधिक संवेदनशील होती.

ख्रिस्ताने बालामाला म्हटले: “मी तुला विरोध करण्यासाठी बाहेर आलो, म्हणजेच तुझ्यासाठी सैतान व्हायला आलो.” मग ख्रिस्त कसा काय सैतानासारखा झाला? हा काही योगायोग आहे का की, याच्याआधीच्या

अध्यायात आपण वाचतो:

गणना 21:8 परमेश्वर मोशेला म्हणाला, “आग्या सापाची एक प्रतिमा करून झेंड्याच्या खांबावर टांग म्हणजे सर्पदंश झालेल्या कोणा माणसाने त्याच्याकडे पाहिले तर तो जगेल.”

बालाम ख्रिस्ताकडे उपसलेल्या तलवारीसह आणि रागीट मुखमुद्रेसह पाहू शकला असता, आणि आपले पाप ओळखू शकला असता, कबुली देऊन जगू शकला असता. पण बालाामने काय केले?

गणना 22:34 “बलाम परमेश्वराच्या दूताला म्हणाला, “मी पाप केले आहे; तू माझ्याविरुद्ध वाटेत उभा आहेस हे मला ठाऊक नव्हते; तुला हे वाईट दिसत असेल तर मी आपला परत जातो.”

बालामला ठाऊक होते की तो जे करत आहे ते अयोग्य आहे, तरीही त्याने ख्रिस्ताला म्हटले, “जर तुला वाईट वाटत असेल.” बालामने इशारा दुर्लक्षित केला आणि पश्चात्ताप केला नाही. आणि म्हणून ख्रिस्ताने बालामाला त्याच्या हृदयाच्या इच्छेनुसार सोडून दिले. त्याला आपला मार्ग बदलण्यास भाग पाडले नाही.

गणना 22:35 “परमेश्वराचा दूत बलामाला म्हणाला, “ह्या मनुष्यांबरोबर जा, मात्र जे शब्द मी तुला सांगेन तेवढेच बोल.” मग बलाम बालाकाच्या सरदारांबरोबर गेला.”

ख्रिस्ताने बालामाला आपली यात्रा सुरू ठेवू दिली, याचा हा पुरावा आहे की ख्रिस्ताला त्याला मारण्याचा उद्देश नव्हता, तर त्याला त्याच्या पापाशी सामोरे जाण्यासाठी तो आला होता. एकदा बालामने त्या पापाची कबुली द्यायला नकार दिला, तेव्हा त्याला त्याच्या नाशाकडे जाऊ दिले. पण त्या क्षणी ख्रिस्त बालामाच्या मृत्यूचे कारण कसा होऊ शकला असता? बालाम सैतानाच्या आत्म्याने पूर्ण भरलेला होता, आणि त्याच्या कृतींचा अपराध त्याच्या अंगावर स्पष्ट लिहिलेला होता. जर ख्रिस्ताने बालामाकडे पाहिले असते आणि त्याला त्याची सर्व अधर्मे आठवून दिली असती, तर अपराधाचे ते

चिरडणारे ओझामुळे त्याला ठार मारले गेले असते. आत्म्याची तलवार मज्जा आणि हाड वेगळे करून टाकली असती, आणि बालाम कोसळून मरण पावला असता, जसे हनन्या आणि सफिरा आपल्या पापाशी सामोरे गेले तेव्हा मरण पावले.

ज्या क्षणी नोंदींची पुस्तके उघडली जातात, आणि येशूची नजर दुष्टांवर पडते, त्या क्षणी त्यांना त्यांनी केलेले प्रत्येक पाप जाणीवपूर्वक आठवते. त्यांच्या पावलांनी शुद्धता व पवित्रतेच्या मार्गापासून कुठे वळण घेतले, देवाच्या नियमाचा भंग करण्यासाठी अभिमान व बंडखोरीने त्यांना किती दूर नेले, हे त्यांना अचूक दिसते. त्यांनी पापात मग्न राहून ज्या आकर्षक मोहांना प्रोत्साहन दिले, ज्या आशीर्वादांचा गैरवापर केला, देवाच्या दूतांचा तिरस्कार केला, चेतावण्या नाकारल्या, दयेच्या लाटा हट्टी, न पश्चात्ताप करणाऱ्या हृदयाने परत ढकलल्या हे सर्व अगदी जणू जळत्या अक्षरांत लिहिलेले असल्याप्रमाणे त्यांच्या डोळ्यांसमोर उभे राहते. {GC 666.2}

म्हणून आपण पाहतो की ख्रिस्ताचे प्रगटीकरण पूर्णपणे त्या व्यक्तीच्या अवस्थेवर अवलंबून असते जी त्याच्या समोर उभी असते. जेव्हा एखादी व्यक्ती ख्रिस्ताच्या आत्म्याने भरलेली नसते, तेव्हा नियमशास्त्र आत्म्यासमोर आरशासारखी कार्य करते जेणेकरून पाप उघड होईल. अक्षर ठार करते, पण त्याचा उद्देश हा असतो की आत्मा जीवन देऊ शकेल. मोशेद्वारे ख्रिस्ताने दिलेले नियमशास्त्र पाप प्रगट करते, जेणेकरून कृपा आणि सत्य ख्रिस्ताद्वारे दिले जाऊन विपुल होतील.

पुढील कथेत, दावीद अभिमानाने इस्राएलाला इतर राष्ट्रांमध्ये दर्जा देण्यासाठी आपली सेना मोजू इच्छितो, आणि त्याचा परिणाम असा होतो की 70,000 इस्राएली मरतात.

2 शमुवेल 24:1 “परमेश्वराचा कोप इस्राएलावर पुनरपि झाला, आणि इस्राएल व यहूदा ह्यांची गणती करण्याची प्रेरणा देवाने त्यांच्याविरुद्ध दाविदाला केली.”

2 शमुवेल 24:15-16 “मग परमेश्वराने इस्राएलात सकाळपासून नेमलेल्या मुदतीपर्यंत मरी पाठवली; आणि दानापासून बैर-शेब्यापर्यंतच्या लोकांपैकी सत्तर हजार लोक मेले. पण देवदूताने यरुशलेमेचा नाश करण्यासाठी त्यावर आपला हात उगारला तेव्हा परमेश्वराला त्या अरिष्टाविषयी वाईट वाटले, व त्याने लोकांचा नाश करणाऱ्या देवदूतास म्हटले, “आता पुरे कर, आपला हात आटोप.” त्या वेळी परमेश्वराचा दूत अरवना यबूसी ह्याच्या खळ्यानजीक होता.”

या कथेचे पहिले वाचन काहीसे भयंकर वाटते. राजा अभिमानाने लोकांना मोजतो, आणि मग देव एक देवदूत पाठवतो जो 70,000 लोकांना ठार करतो, आणि नंतर देव केलेल्या वाईटाबद्दल खेद व्यक्त करतो आणि अजून लोकांचा वध करणे थांबवतो. याहून अधिक विचित्र म्हणजे 2 शमुवेल 24:1 प्रत्यक्षात असे म्हणते की देवाने स्वतः दावीदाला इस्राएलाची गणती करायला प्रवृत्त केले, म्हणजे जे पुढे घडले त्यासाठी देवच जबाबदार असल्याचे दिसते. मग जो कोणी “देव प्रेम आहे” असा विश्वास ठेवतो त्याच्यासाठी हा प्रश्न निर्माण होतो: “शेवटी ही कथा कशाबद्दल आहे?”

जरी पुढील कथा अधिक लोकांच्या मृत्यूशी संबंधित आहे, तरीही ती काहीशी स्वीकारण्यास सोपी वाटते कारण त्या राष्ट्राने देवाच्या लोकांना मारण्याची इच्छा व्यक्त केली होती आणि ते पृथ्वीवरील काही अत्यंत क्रूर लोक होते. अश्शूर लोक माणसांचे जिवंत कातडं सोलून घेत आणि नंतर त्यांना भाल्यावर खुपसत. देवाच्या अनुयायांवर इतक्या हिंसकपणे केलेल्या वागणुकीमुळे, परमेश्वराच्या देवदूतांनी प्राणघातक हिंसेचा वापर केला हे मान्य करण्याचा प्रश्न कदाचित शांत होऊ शकतो.

2 राजे 19:35 “त्या रात्री असे झाले की परमेश्वराच्या देवदूताने जाऊन अश्शूरी गोटातले एक लक्ष पंचाऐंशी हजार लोक मारले; पहाटेस लोक उठून पाहतात तर सर्व प्रेतेच प्रेते!”

प्रेरणा या कथेत अशी नोंद घालते:

"देवाच्या अधीन राहून देवदूत सर्वशक्तिमान आहेत. एका प्रसंगी, ख्रिस्ताच्या आज्ञेचे पालन करून त्यांनी एका रात्रीत अश्शूरांच्या सैन्यातील एक लाख पंच्याऐंशी हजार माणसे ठार केली." {DA 702}

या विधानांचे सरळ वाचन केल्यास असे सुचते की परमेश्वराच्या देवदूतांनी 1,85,000 अश्शूर सैनिकांना ठार केले. हे अगदी तर्कसंगत वाटते की जेव्हा एखादा दुष्ट धोका देवाच्या लोकांना मारण्याचा प्रयत्न करत असेल, तेव्हा त्यांच्या हत्यारी कटांसाठी या सैनिकांना ठार केले जावे.

आपल्या यादीतील शेवटची कथा हेरोदाशी संबंधित आहे. त्याने केलेल्या सर्व कृत्यांचा विचार करता त्याला ठार मारले जाणे हे अगदी योग्यच वाटते.

प्रेषितांचीं कृत्यें 12:21-23  "नंतर नेमलेल्या दिवशी हेरोद राजवस्त्रे घालून आसनावर बसला आणि जमलेल्या लोकांपुढे भाषण करू लागला. तेव्हा लोक गजर करून बोलले, "ही देववाणी आहे, मनुष्यवाणी नव्हे." त्याने देवाचा गौरव केला नाही, म्हणून तत्क्षणी प्रभूच्या दूताने त्याच्यावर प्रहार केला आणि तो किडे पडून मेला."

हेरोदने योहानाचा भाऊ याकोबाला ठार मारले होते आणि मग पेत्राला ठार करण्याचा बेत आखला होता. या कथेबद्दल प्रेरणादायी लेखन असे म्हणते:

"तोच देवदूत, जो पेत्राला सोडविण्यासाठी राजदरबारातून आला होता, तोच हेरोदासाठी कोप आणि न्यायाचा दूत ठरला. देवदूताने पेत्राला झोपेतून उठवण्यासाठी हलवले; पण एका वेगळ्या प्रहाराने त्याने त्या दुष्ट राजाला मारले, त्याचा अभिमान खाली पाडला आणि त्याच्यावर सर्वशक्तिमानाचा दंड आणला. हेरोद मनाने आणि शरीराने फार यातना सोसून, देवाच्या प्रतिशोधाच्या न्यायाखाली मरण पावला." {AA 152.1}

हे स्पष्ट आहे की हेरोदाला मारणारा देवदूत चांगला देवदूत होता. हे देखील स्पष्ट आहे की हा सर्वशक्तिमानाकडून आलेला दंड होता आणि तो देवाचा प्रतिशोधी न्याय होता. प्रतिशोध म्हणजे केलेल्या कृत्यांची परतफेड किंवा दिलेली शिक्षा. या टप्प्यावर आपला शोध थांबवणे आणि असा निष्कर्ष काढणे

की खरंच देव आपले चांगले देवदूत पाठवतो जेणेकरून दुष्ट लोकांना ठार करता येईल हे अत्यंत मोहक वाटते. जरी पहिली कथा गुंतागुंतीची आहे, तरी उर्वरित दोन कथा म्हणजे अश्शूर व हेरोद यांच्याबद्दलच्या कथा अगदी स्पष्ट दिसतात. आणि याउलट काही सुचविणे म्हणजे बायबलला “आध्यात्मिकरित्या समजावून घेणे” असा आरोप होऊ शकतो, म्हणजे असे दाखवण्यासाठी की देव इतका प्रेमळ आहे की तो असे काहीही कधीच करणार नाही.

## आपण कसे वाचतो?

जर आपण आपला शोध येथेच थांबवला असता, तर आपण नक्कीच बायबलच्या व्याख्येचे ते नियम मोडले असते, जे तिसऱ्या देवदूताचा संदेश सांगणाऱ्यांसाठी ठरवलेले आहेत.

जे लोक तिसऱ्या देवदूताचा संदेश जाहीर करण्याचे कार्य करीत आहेत, ते शास्त्रांचा अभ्यास अगदी त्याच पद्धतीने करीत आहेत, जी पद्धत मिलरने अवलंबली होती. “Views of the Prophecies and Prophetic Chronology” या छोट्या पुस्तकात मिलरने बायबल अभ्यास आणि व्याख्येसाठी काही साधे पण बुद्धिमान आणि महत्वाचे नियम दिले आहेत: १. बायबलमध्ये दिलेल्या विषयाशी संबंधित प्रत्येक शब्दाला त्याचे योग्य स्थान असले पाहिजे. २. सर्व शास्त्र आवश्यक आहे, आणि ते मनापासून प्रयत्न आणि अभ्यासाने समजता येते. ३. शास्त्रात जे काही प्रगट झाले आहे, ते विश्वासाने मागणाऱ्यांपासून कधीही लपविले जाणार नाही. ४. शिकवण समजण्यासाठी, ज्या विषयाबद्दल जाणून घ्यायचे आहे त्या विषयावरील सर्व वचने एकत्र आणा, मग प्रत्येक शब्दाला त्याचा योग्य प्रभाव द्या; आणि जर तुम्ही कोणताही विरोधाभास न ठेवता आपला सिद्धांत बनवू शकत असाल, तर तुम्ही चुकीचे असणार नाही. ५. शास्त्र हे स्वतःच आपले स्पष्टीकरण करणारे असले पाहिजे, कारण ते स्वतःच एक नियम आहे. जर मी एखाद्या शिक्षकावर अवलंबून राहिलो की त्याने मला अर्थ समजावून सांगावा, आणि त्याने फक्त तर्क केला, किंवा

त्याला आपल्या पंथीय मतामुळे तसे करायचे असेल, किंवा स्वतःला ज्ञानी समजवून घ्यायचे असेल, तर त्याचा तर्क, इच्छा, पंथीय मत किंवा शहाणपण हे माझे नियम ठरतील, आणि बायबल नाही.” {RH, November 25, 1884, par. 24}

जर आपण सर्व मुद्दे एकत्र आणण्यापूर्वीच निष्कर्ष बनविला आणि मग त्या निष्कर्षाचा वापर करून अशी वचने दुर्लक्षित केली जी काही वेगळे सांगत असल्यासारखी दिसतात, तर आपण मिलरचे नियम पाळत नाही आणि त्यामुळे आपण तिसऱ्या देवदूताचा संदेश सांगणे थांबवतो. हा एक गंभीर विचार करण्यासारखा मुद्दा आहे.

मग आपण या कथांचा या विधानांशी कसा मेळ घालायचा?

मत्तय ५:४४ मी तर तुम्हांला सांगतो, तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा, [जे तुम्हांला शाप देतात त्यांना आशीर्वाद द्या, जे तुमचा द्वेष करतात त्यांचे बरे करा] आणि जे तुमचा छळ करतात [व तुमच्या पाठीस लागतात] त्यांच्यासाठी प्रार्थना करा.

लूक ९:५४-५६ तेव्हा त्याचे शिष्य याकोब व योहान हे पाहून म्हणाले, “हे प्रभू, एलीयाने केले होते तसेच आकाशांतून अग्नीने पडून त्याचा नाश करावा म्हणून आम्ही आज्ञा करावी, अशी तुझी इच्छा आहे काय?” परंतु त्याने वळून त्यांना धमकावले आणि म्हटले, “तुम्ही कोणत्या आत्म्याचे आहात हे तुम्हास ठाऊक नाही; कारण मनुष्याचा पुत्र मनुष्यांच्या जीवाचा नाश करायला नाही, तर त्यांना तारायला आला आहे.” मग ते दुसऱ्या गावाला गेले.

मत्तय २६:५२ तेव्हा येशू त्याला म्हणाला, “तुझी तलवार परत जागच्या जागी घाल, कारण तलवार धरणारे सर्व जण तलवारीने नाश पावतील.

२ पेत्र ३:९ कित्येक लोक ज्याला विलंब म्हणून म्हणतात तसा विलंब प्रभू आपल्या वचनाविषयी करत नाही, तर तो तुमचे धीराने सहन करतो; कोणाचा नाश व्हावा अशी त्याची इच्छा नाही, तर सर्वांनी पश्चात्ताप करावा अशी आहे.

## एक नैसर्गिक प्रतिसाद

आपल्या शत्रूंना प्रेम करण्याच्या आज्ञेला एक नैसर्गिक उत्तर असे असू शकते की, जरी आपल्याला आपल्या शत्रूंना प्रेम करण्याची आज्ञा दिली आहे, तरी विश्वाचा योग्य न्यायाधीश म्हणून देवाला आपल्या राज्यात सुव्यवस्था व शिस्त राखण्याचा अधिकार आणि जबाबदारी आहे. त्याचे विषय म्हणून आपल्याला आपल्या शत्रूंना प्रेम करायचे आहे आणि विश्वास ठेवायचा आहे की देव आपले रक्षण करील, आणि जर गरज भासली तर जे आपल्याला धमकावतात त्यांना तो ठार करील.

दुसरे म्हणजे असेही म्हटले जाऊ शकते की जेव्हा येशू पृथ्वीवर होता, तेव्हा त्याचे कार्य खरोखरच नष्ट करणे नव्हते, तर माणसांचे उद्धार करणे होते. कदाचित असे म्हटले जाऊ शकते की त्याचे येथे पृथ्वीवरील कार्य पूर्ण झाल्यावर, त्याच्या सेवाकार्याचे इतर पैलू पूर्ण होणे आवश्यक होते. जसे शास्त्र सूचित करते:

उपदेशक 3:3 “वधण्याचा समय व बरे करण्याचा समय; मोडून टाकण्याचा समय व बांधून काढण्याचा समय असतो;”

अनुवाद 32:39 "आता पाहा, मी, मीच तो आहे, माझ्याशिवाय कोणी देव नाही; प्राणहरण व प्राणदान करणारा मीच आहे. मी घायाळ करतो आणि मीच बरे करतो; माझ्या हातून सोडवणारा कोणी नाही.”

जर आपण हा दृष्टिकोन स्वीकारला, तर येशूला एक सामर्थ्यशाली सेनापती म्हणून पाहणे शक्य होते, जो गरज पडेल तेव्हा आपल्या विश्वासू सैनिकांना प्राणघातक शस्त्रांनी सज्ज मृत्यूचे संदेशवाहक म्हणून पाठवतो. खालील

मजकूर आपल्याला ही कल्पना सहजपणे देऊ शकतो:

निर्गम 15:3 “परमेश्वर रणवीर आहे; याव्हे हे त्याचे नाव.”

यहोशवा 5:13,14 “यहोशवाने यरीहोजवळ असताना समोर पाहिले तो कोणी पुरुष आपल्या हाती उपसलेली तलवार घेऊन पुढे उभा आहे असे त्याच्या नजरेस पडले. यहोशवाने जवळ जाऊन विचारले, “तू आमच्या पक्षाचा की आमच्या वैऱ्यांच्या पक्षाचा?” तो म्हणाला, “नाही; मी येथे परमेश्वराचा सेनापती ह्या नात्याने आलो आहे.” तेव्हा यहोशवाने त्याला दंडवत घालून म्हटले, “स्वामींची आपल्या दासाला काय आज्ञा आहे?’”

स्तोत्र 2:4-9 “स्वर्गात जो राजासनारूढ आहे तो हसत आहे; प्रभू त्यांचा उपहास करीत आहे. पुढे तो त्यांच्याशी क्रोधयुक्त होऊन बोलेल, तो संतप्त होऊन त्यांना घाबरे करील. तो म्हणेल, “मी आपल्या पवित्र सीयोन डोंगरावर आपला राजा अधिष्ठित केला आहे.” मी परमेश्वराचा निर्णय कळवतो; तो मला म्हणाला, “तू माझा पुत्र आहेस, आज मी तुला जन्म दिला आहे; माझ्याजवळ माग म्हणजे मी तुला राष्ट्रे वतनादाखल देईन, पृथ्वीच्या दिगंतापर्यंतचे स्वामित्व तुला देईन; लोहदंडाने तू त्यांना फोडून काढशील; कुंभाराच्या मडक्यासारखा त्यांचा चुराडा करशील.”

यहेज्केल 9:1,2,5,6 “मग त्याने मला ऐकू येईलसे मोठ्याने म्हटले, “नगररक्षकहो, तुम्ही सगळे आपली विध्वंसक हत्यारे हाती घेऊन इकडे या.” तेव्हा पाहा, उत्तरेकडील वरच्या वेशीने सहा पुरुष आपल्या हाती विध्वंसक हत्यारे घेऊन आले; त्यांच्यामध्ये शुभ्र तागाचे वस्त्र ल्यालेला एक मनुष्य होता; त्याच्या कंबरेनजीक कारकुनाची दऊत होती. ते आत जाऊन पितळी वेदीजवळ उभे राहिले. मला ऐकू येईलसे तो त्या बाकीच्यांना म्हणाला, “त्याच्यामागून नगरात जा व संहार करा; कृपादृष्टी करू नका; गय करू नका, वृद्ध, तरुण व कुमारी, मुले व स्त्रिया ह्यांची निखालस कत्तल करा; पण ज्यांच्यावर चिन्ह असेल त्यांना स्पर्श करू नका; माझ्या पवित्रस्थानापासून आरंभ करा.” तेव्हा मंदिरापुढे असलेल्या वडिलांपासून त्यांनी आरंभ केला.

प्रकटीकरण 16:1-3 “नंतर मी ‘मंदिरातून निघालेली एक’ मोठी ‘वाणी’ ऐकली; ती त्या सात देवदूतांना म्हणाली, “जा, देवाच्या ‘क्रोधाच्या’ सात वाट्या ‘पृथ्वीवर ओता.”’ तेव्हा पहिल्याने जाऊन आपली वाटी पृथ्वीवर ओतली तेव्हा त्या श्वापदाची खूण धारण केलेल्या आणि त्याच्या मूर्तीला नमन करणाऱ्या ‘लोकांना’ वाईट व ‘घाणेरडे फोड आले.’ दुसऱ्याने आपली वाटी समुद्रात ओतली, तेव्हा ‘समुद्र’ मृत माणसाच्या रक्तासारखा ‘रक्तमय झाला’ आणि ‘त्यातील’ सर्व प्राणी ‘मरून गेले."

आपल्यासमोर उभे केलेले चित्र असे आहे की देवाचा सामर्थ्यशाली पुत्र, ज्याने गरज पडेल तेव्हा आपली तलवार उचललेली आहे, आणि जे काही करणे आवश्यक आहे ते करतो. असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो की तो कुमारिका आणि लहान मुलांना ठार मारण्यासाठी शस्त्रधारी माणसे का पाठवतो; पण शास्त्राचे कथित सरळ वाचन असे सुचवेल की हे खरोखरच असेच समजले पाहिजे, जरी ते अत्यंत हिंस्र कृत्य असल्यासारखे वाटते.

## ख्रिस्त आपला परिपूर्ण आदर्श

जर आपण हा दृष्टिकोन स्वीकारला, तर आपण एका मोठ्या समस्येला सामोरे जातो. जर देवाचा पुत्र स्वतः आज्ञा देतो आणि स्वतःही पाप्यांशी वागण्यासाठी प्राणघातक शक्ती वापरतो, तर मग आपण अडचणीत येतो कारण अशा वेळी येशू आपल्या अनुसरणासाठी दिलेला परिपूर्ण आदर्श राहात नाही. जोपर्यंत अर्थातच आपण या विचारात जात नाही की देव माणसांना त्याच्या सन्मानाचे रक्षण करण्यासाठी, त्याच्या शत्रूंना ठार मारायला बोलावतो. शास्त्र जसे सांगते तसे, येशू काल, आज आणि उद्याही सारखाच आहे काय? की तो प्रत्येक परिस्थितीनुसार आवश्यक तेवढेच स्वतःचे पैलू प्रगट करतो? मग येशूने आपल्याला अनुसरण्यासाठी कोणता आदर्श दिला?

१ पेत्र 2:21-23 “कारण ह्याचकरता तुम्हांला पाचारण करण्यात आले आहे; कारण ख्रिस्तानेही तुमच्यासाठी दुःख भोगले आणि तेणेकरून तुम्ही त्याच्या

पावलांवर पाऊल ठेवून चालावे म्हणून त्याने तुमच्याकरता कित्ता घालून दिला आहे. त्याने पाप 'केले नाही, आणि त्याच्या मुखात कपट आढळले नाही.' त्याची निंदा होत असता त्याने उलट निंदा केली नाही; दुःख भोगत असता त्याने धमकावले नाही; तर यथार्थ न्याय करणाऱ्याकडे स्वतःला सोपवून दिले."

ख्रिस्त आपला नमुना आहे, परिपूर्ण आणि पवित्र आदर्श, जो आपल्याला अनुसरण्यासाठी दिला गेला आहे. हस्तलिखित 65, 1894

"देवाने आपल्यासाठी तो जे काही करू शकला ते काहीही न सोडता केले आहे. त्याने आपल्या पुत्राच्या स्वभावात आपल्या स्वतःच्या स्वभावाचा परिपूर्ण आदर्श दिला आहे; आणि ख्रिस्ताचे अनुयायी, जेव्हा त्याच्या जीवनातील आणि स्वभावातील अतुलनीय उत्कृष्टतेकडे पाहतात, तेव्हा त्याच्या प्रतिमेत वाढ करणे हे त्यांचे काम आहे. जेव्हा ते येशूकडे पाहतात आणि त्याच्या प्रेमाला प्रतिसाद देतात, तेव्हा ते ख्रिस्ताच्या प्रतिमेचे प्रतिबिंब दाखवतील." (रिव्ह्यू अँड हेराल्ड, 15 फेब्रुवारी 1898)

जर आपण येशूला आपल्या शत्रूंविरुद्ध प्राणघातक शक्ती वापरणारा सामर्थ्यशाली सेनापती म्हणून स्वीकारले, तर मग आपण अशा गोष्टी वाचताना आपले मन खरोखरच संघर्ष करू लागते:

मत्तय 5:39-44 मी तर तुम्हांला सांगतो, दुष्टाला अडवू नका. जो कोणी तुझ्या उजव्या गालावर मारतो, त्याच्याकडे दुसरा गाल कर; जो तुझ्यावर फिर्याद करून तुझी बंडी घेऊ पाहतो त्याला तुझा अंगरखाही घेऊ दे; आणि जो कोणी तुला वेठीस धरून एक कोस नेईल त्याच्याबरोबर दोन कोस जा. जो तुझ्याजवळ काही मागतो त्याला दे आणि जो तुझ्यापासून उसने घेऊ पाहतो त्याला पाठमोरा होऊ नकोस. 'आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर व आपल्या वैऱ्याचा द्वेष कर,' असे सांगितले होते, हे तुम्ही ऐकले आहे. मी तर तुम्हांला सांगतो, तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा, [जे तुम्हांला शाप देतात त्यांना आशीर्वाद द्या, जे तुमचा द्वेष करतात त्यांचे बरे करा] आणि जे तुमचा छळ करतात [व तुमच्या पाठीस लागतात] त्यांच्यासाठी प्रार्थना करा.

मग हा प्रश्न विचारणे योग्य नाही का की: “तू आम्हांला सांगतोस की आम्ही आमच्या शत्रूंवर प्रेम करावे, पण जेव्हा तुला सोयीचे वाटते तेव्हा तू स्वतःच्या शत्रूंना ठार करतोस हे सुसंगत आहे काय?”

आणखी खोल स्तरावर, जे लोक येशूवर विश्वास ठेवतात त्यांच्यावर त्याच्या आत्म्याचा श्वास फुंकला जातो. याचा अर्थ असा की येशूजवळ असलेले जे काही गुणधर्म आहेत ते त्याचे अनुयायींनाही दिले जातील.

गलतीकरांस 4:6 “तुम्ही पुत्र आहात, म्हणून देवाने “अब्बा! बापा!” अशी हाक मारणाऱ्या आपल्या पुत्राच्या आत्म्याला तुमच्याआमच्या अंतःकरणांत पाठवले आहे.”

१ योहान 3:2 प्रियजनहो, आपण आता देवाची मुले आहोत; आणि पुढे आपण काय होऊ हे अजून प्रकट झालेले नाही; तरी तो प्रकट होईल तेव्हा आपण त्याच्यासारखे होऊ हे आपल्याला माहीत आहे, कारण जसा तो आहे तसाच तो आपल्याला दिसेल.

मग काय, येशू आपल्याला स्वतःचाच फक्त एक भाग देईल का जो शत्रूंवर प्रेम करतो, पण जो भाग शत्रूंना ठार करतो आणि त्यांना जिवंत जाळतो तो मागे ठेवेल? हे शक्य आहे काय? म्हणून येथे संघर्षाचा मुद्दा असा आहे:

| | |
|---|---|
| येशूला जे त्याच्यावर आणि त्याच्या पित्याविरुद्ध दुष्टपणात कायम राहतात त्यांना नष्ट करण्याचा अधिकार आणि जबाबदारी आहे. | येशू आपला परिपूर्ण आदर्श आहे, आणि शास्त्रात प्रगट झालेल्या त्याच्या जीवनाच्या प्रत्येक पैलूचे अनुकरण करावयास आपण बोलावले गेलो आहोत. |

## नियमशास्त्र देवाच्या स्वभावाचे प्रतिबिंब

चला, यामध्ये अजून एक पैलू जोडूया. दहा आज्ञा म्हणजे देवाच्या स्वभावाचे प्रगटीकरण आहेत.

देवाचे नियमशास्त्र ही त्याच्या स्वभावाची प्रतिमा आहे. त्यात त्याच्या राज्याची तत्त्वे सामावलेली आहेत. जो कोणी या तत्त्वांना स्वीकारण्यास नकार देतो तो स्वतःला त्या प्रवाहाच्या बाहेर ठेवतो जिथे देवाचे आशीर्वादे ओतली जातात. {COL 305}

देव आपल्या मुलांकडून परिपूर्णतेची मागणी करतो. त्याची व्यवस्था ही त्याच्या स्वतःच्या स्वभावाची प्रतिमा आहे आणि तीच सर्व स्वभावांसाठीची कसोटी आहे. हा अनंत मानदंड सर्वांसमोर ठेवण्यात आला आहे, जेणेकरून देवाचे राज्य कोणत्या प्रकारच्या लोकांपासून तयार होईल याबद्दल कोणताही गैरसमज राहू नये. {COL 315}

देवाची व्यवस्था ही त्याच्या स्वभावाची प्रतिमा आहे; ती देवाचे स्वरूप दाखवते. जसे आपण ख्रिस्तामध्ये त्याच्या तेजस्वी महिमेला, त्याच्या व्यक्तीच्या अचूक प्रतिमेला पाहतो, तसेच व्यवस्थेत पित्याचे गुण उलगडतात. {ST, 30 डिसेंबर 1889}

देव इच्छितो की सर्व लोकांनी जाणावे, जिथे जिथे त्याचा आवाज ऐकला जातो, की ख्रिस्ताच्या आज्ञाधारकतेमुळे विश्वासणाऱ्याला मिळणारे धार्मिकत्व हेच

ते धार्मिकत्व आहे जे सिनाय पर्वतावरून बोललेल्या नियमशास्त्रात वर्णन केलेले आहे. त्यातील एकही अक्षर बदलता येणार नाही. ती देवाच्या स्वभावाचे ख्रिस्तामध्ये प्रगट झालेले अचूक छायाचित्र आहे. {E.J. Waggoner, Everlasting Covenant 343.1}

येशू आपल्याला सांगतो की तो आपल्या पित्याच्या आज्ञा पाळतो:

योहान 15:10 "जसा मी आपल्या पित्याच्या आज्ञा पाळून त्याच्या प्रीतीत राहतो तसे तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल तर माझ्या प्रीतीत राहाल."

यामध्ये ती आज्ञा देखील समाविष्ट आहे का जी म्हणते: "तू खून करू नकोस"? जेव्हा आपण पृथ्वीवरील येशूचे जीवन पाहतो, तेव्हा आपण पाहतो की त्याने कधीच कोणाला ठार मारले नाही.

"हेरोद आणि दुष्ट अधिकारी यांनी त्या न्याय्याला ठार मारले, पण ख्रिस्ताने कधीच कोणाला ठार केले नाही; आणि आपण छळभावनेचे मूळ कारण माणसांना अंत:करणाच्या स्वातंत्र्याची इच्छा असते हे त्याच्या खऱ्या उगमाशी म्हणजे सैतानाशी जोडले पाहिजे." {Ms62-1886.64}

मग प्रश्न असा आहे: पृथ्वीवरील येशूच्या जीवनाने देवाचा स्वभाव पूर्णपणे प्रगट केला काय?

मानवजातीसमोर पित्याचे प्रतिनिधित्व फक्त ख्रिस्तच करू शकला, आणि हे प्रतिनिधित्व शिष्यांना तीन वर्षांपेक्षा अधिक काळ पाहण्याचा विशेषाधिकार लाभला होता. {DA 664}

देवाचा संपूर्ण स्वभाव त्याच्या पुत्रामध्ये प्रगट झाला. अनंताच्या पुत्रामध्ये मानवाच्या स्वीकारासाठी स्वर्गातील सर्व शक्यतांचा संपूर्ण पट दाखवला गेला आहे. {ST, 30 डिसेंबर 1889}

ख्रिस्ताच्या जीवनात प्रगट झालेला हा स्वभाव म्हणजे देवाचा स्वभावच आहे. पित्याच्या हृदयातून दैवी करुणेचे प्रवाह बाहेर पडतात, आणि ते ख्रिस्तामध्ये प्रगट होऊन मानवाच्या मुलांपर्यंत पोहोचतात. येशू हा कोमल, दयाळू तारणारा

हा देवच “देहामध्ये प्रगट झाला” होता. १ तीमथ्य 3:16; {SC 12}

## न्यायालयीन हत्या आणि खून यात फरक?

असे प्रतिपादन केले जाते की न्यायनिष्ठ ठार मारणे म्हणजे हत्या नव्हे, आणि दहा आज्ञा शिकवतात “तू खून करू नकोस.” या मुद्द्याचे स्पष्टीकरण करणारी ही एक मांडणी पुढे दिलेली आहे:

हिब्रू भाषेत “हत्या” आणि “मारणे” यासाठी दोन वेगवेगळे शब्द आहेत रात्साख (ratsakh) आणि मुत (mut); तसेच ग्रीक भाषेतही दोन शब्द आहेत फोन्यूओ (phoneuo) आणि अपोक्टीनो (apokteino). यापैकी एका शब्दाचा अर्थ “एखाद्याला ठार मारणे” असा आहे, तर दुसऱ्याचा अर्थ “हत्या करणे” असा आहे. ह्या दुसऱ्या अर्थातला शब्दच दहा आज्ञांनी प्रतिबंधित केलेला आहे, पहिला नव्हे. खरं तर, रात्साख या शब्दाचा अर्थ (हत्या) पेक्षा अधिक व्यापक आहे. रात्साख मध्ये निष्काळजीपणा किंवा दुर्लक्षामुळे झालेल्या मृत्यूचाही समावेश होतो; पण युद्धकाळात घडलेल्या हत्यांचे वर्णन करताना हा शब्द कधीही वापरला जात नाही. म्हणूनच आधुनिक अनुवादांमध्ये सहावी आज्ञा बहुधा “ (तू खून करू नकोस) अशी दिलेली आहे, (तू हत्या करू नकोस) अशी नाही. मात्र, एखाद्याने कोणता अनुवाद अभ्यासला आहे यावरून मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो. अत्यंत लोकप्रिय असलेल्या KJV मध्ये हा पद (तू ठार मारू नकोस) असा दिलेला आहे, ज्यामुळे या वचनाचा चुकीचा अर्थ लावण्याचे दार उघडते. जर “तू ठार मारू नकोस" याचा अपेक्षित अर्थ फक्त एवढाच असता की अजिबात कुणाला ठार मारू नका तर मग देवाने इस्राएल राष्ट्राकडून करवून घेतलेले सर्व रक्तपात (अनुवाद 20) हे देवाच्या स्वतःच्या आज्ञेचे

उल्लंघन ठरले असते. पण देव आपल्याच आज्ञा मोडत नाही. त्यामुळे हे स्पष्ट आहे की या वचनाचा अर्थ असा नाही की दुसऱ्या मनुष्याचे जीवन घेण्यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे.

https://www.gotquestions.org/you-shall-not-murder.html

शास्त्राचे काळजीपूर्वक परीक्षण केल्यावर हे प्रतिपादन खोटे ठरते. पहिले म्हणजे, लेखकाच्या स्पष्टीकरणातच तो मान्य करतो की रात्साख (ratsach) चा अर्थ फक्त हत्या नसून अपघाती मृत्यूदेखील होतो, ज्याला आपण मनस्लॉटर (अनवधानाने खून) म्हणतो. हे हत्या नाही.

गणना 35:22-25 “तथापि कोणी वैरभावाने नव्हे पण अचानक एखाद्याला ढकलले किंवा टपून न बसता त्याच्यावर एखादे शस्त्र फेकले, किंवा ज्याकडून मृत्यू घडेल असा धोंडा हातात घेऊन नकळत कोणावर फेकला, आणि त्यामुळे तो मेला, आणि तो त्याचा शत्रू नसला अथवा त्याने त्याची हानी करू पाहिली नसली, तर मंडळीने मारणाऱ्याचा आणि रक्तपाताबद्दल सूड घेणाऱ्याचा न्याय ह्या नियमानुसार करावा. मग मनुष्यवध करणाऱ्या त्या मनुष्याला, रक्तपाताबद्दल सूड घेणाऱ्याच्या हातून सोडवून ज्या शरणपुरात तो पळून गेला होता तेथे त्याला मंडळीने पुन्हा पोचते करावे; आणि पवित्र तेलाने अभिषेक केलेला मुख्य याजक मरेपर्यंत त्या मनुष्याने तेथेच राहावे.”

अनुवाद 4:42 “ह्यासाठी की, एखाद्याने चुकून म्हणजे पूर्वी काही वैर नसताना आपल्या शेजाऱ्याला ठार मारले तर त्याने ह्यांतल्या एका नगरात पळून जाऊन आपला जीव वाचवावा.”

दुसरे म्हणजे, देवाने आज्ञा केली होती की ज्यांनी रात्साख केले त्यांनी त्याच शिक्षेला सामोरे जावे.

गणना 35:30 “कोणी एखाद्या मनुष्याचा खून केला तर साक्षीदारांच्या साक्षीवरून त्या खून करणाऱ्याला जिवे मारावे; पण एकाच साक्षीदाराच्या साक्षीवरून कोणाला जिवे मारू नये.”

मग असे कसे शक्य आहे की देव अशा गोष्टींची आज्ञा करेल ज्या दहा आज्ञांनी प्रतिबंधित केल्या आहेत? थोडक्यात सांगायचे तर, देव शास्त्रात मृत्यूच्या कोणत्याही स्वरूपाची आज्ञा देऊ शकतो कारण देव लोकांना ठार मारण्याकरिता नव्हे, तर दया दाखविण्यासाठी मृत्यूच्या शिक्षेचा आदेश देतो. याचे सविस्तर स्पष्टीकरण "मृत्यूची सेवा" या मराठी पुस्तिकेत पाहता येईल.

तिसरे म्हणजे, मुथ [H4191] हा शब्द शास्त्रात हत्या व खून यांचे वर्णन करण्यासाठी वापरला गेला आहे. शौलाला दावीदचा अन्यायाने खून करायचा होता:

१ शमुवेल 19:1-2 “शौलाने आपला पुत्र योनाथान व आपले सर्व सेवक ह्यांना सांगून ठेवले की दाविदाला मारून [H4191] टाकावे; पण शौलाचा पुत्र योनाथान ह्याचे दाविदावर फारच मन बसले होते. म्हणून योनाथानाने दाविदाला सागितले की, “माझा बाप शौल तुला मारून [H4191] टाकायला पाहत आहे; तर तू सकाळपर्यंत सावध होऊन एखाद्या गुप्त स्थळी लपून राहा.

शौलाने याजकांचा बेकायदेशीर खून करण्याची आज्ञा दिली:

१ शमुवेल 22:17 “तेव्हा जवळ शिपाई उभे होते त्यांना राजा म्हणाला, “चला, परमेश्वराच्या याजकांचा वध करा; कारण त्यांनी दाविदाशी हातमिळवणी केली आहे; तो पळून गेला हे त्यांना ठाऊक असूनही त्यांनी माझ्या कानावर घातले नाही;” पण परमेश्वराच्या याजकांवर राजाचे सेवक आपला हात टाकीनात."

ईश-बोशेथाची हत्या:.

२ शमुवेल 4:7 “ते घरात शिरले तेव्हा तो आपल्या शय्यागृहात पलंगावर निजला होता; तेथे त्यांनी त्याच्यावर प्रहार करून त्याचा वध केला व त्याचे शिर कापून घेऊन ते रातोरात अराबाच्या वाटेने गेले.”

अबशालोमने आपल्या सावत्र भावाचा अम्मोनचा बेकायदेशीर खून करण्याची आज्ञा दिली:

२ शमुवेल 13:28 “अबशालोमाने आपल्या सर्व सेवकांना अशी ताकीद देऊन ठेवली होती की, “सावध राहा, अम्नोन द्राक्षारस पिऊन रंगात आला म्हणजे मी तुम्हांला इशारा केल्याबरोबर तुम्ही अम्नोनावर प्रहार करून त्याला ठार करा, काही भिऊ नका; मी तुम्हांला हुकूम करतो आहे ना? हिंमत धरा, शौर्य दाखवा.”

अथल्याने राजा योवाश वगळता सर्व राजपुत्रांचा खून केला:

२ राजे 11:2 “तरी योराम राजाची कन्या व अहज्याची बहीण यहोशेबा हिने अहज्याचा पुत्र योवाश ह्याला त्या वधायच्या राजपुत्रांतून चोरून नेले आणि त्याला व त्याच्या दाईला बिछाने ठेवण्याच्या कोठडीत लपवून ठेवले; त्याला अथल्येच्या दृष्टिआड केल्यामुळे त्याचा वध झाला नाही.”

नवीन IRVMAR  मधील अनुवाद लक्षात घ्या:

२ राजे 11:2 (IRVMAR) “पण यहोशेबा, ही राजा योरामाची मुलगी आणि अहज्याची बहीण. योवाश हा राजाच्या अनेक मुलांपैकी एक. इतर मुलांची हत्या होत असताना यहोशेबाने योवाशाला बाजूला घेतले आणि आपल्या झोपायच्या खोलीत लपवून ठेवले. तिने योवाश आणि त्याची दाई यांना लपवले. यहोशेबा आणि ती दाई यांनी योवाशाला अथल्याच्या तावडीतून सोडवले म्हणून तो मारला गेला नाही.”

“muth” या शब्दाचा वापर करून आणखी एक खून आणि IRVMAR मधील भाषांतर:

2 राजे 15:25 रमाल्याचा मुलगा पेकह हा त्याचा सरदार होता. त्याने अर्गोब व अरये आणि गिलादी लोकांतले पन्नास माणसे आपल्यासोबत घेतली, आणि त्याच्याविरुध्द कट करून त्यास शोमरोन मध्ये राजाच्या घरांतल्या महालात मारून ठार केले आणि त्याच्या जागी पेकह राज्य करू लागला.

2 राजे 15:25 “त्याचा सरदार रमाल्याचा पुत्र पेकह ह्याने त्याच्याशी फितुरी करून शोमरोनाच्या राजवाड्याच्या मनोऱ्यात त्याला व त्याच्याबरोबर अर्गोब व अरये ह्यांना वधले; पेकहाबरोबर पन्नास गिलादी लोक होते; त्यांना वधून

त्याच्या जागी तो राजा झाला.”

दुष्ट माणूस खरोखर धर्मीपणे एखाद्याचा वध करू शकतो काय?

स्तोत्र 37:32 “दुर्जन नीतिमानावर टपलेला असतो, व त्याला जिवे मारण्यास तो पाहत असतो.”

स्तोत्र 109:16-17 “कारण त्या मनुष्याने दया करण्याची आठवण ठेवली नाही, तर दीन, दरिद्री व दुःखी माणसांचा वध करण्यासाठी तो त्यांच्या पाठीस लागला. शाप देण्याची त्याला आवड असे म्हणून तो शाप त्यालाच लागो; आशीर्वाद देण्याची त्याला आवड नसे म्हणून तो आशीर्वादाला मुको.”

यिर्मयाला ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरुद्ध इशारा:

यिर्मया 26:13-15 “ह्यास्तव आता तुम्ही आपले मार्ग व आपली कर्मे सुधारा, परमेश्वर तुमचा देव ह्याची वाणी तुम्ही ऐका, म्हणजे तुमच्यावर जे अरिष्ट आणीन असे परमेश्वर बोलला त्याविषयी त्याला अनुताप होईल. माझ्याविषयी म्हणाल तर पाहा, मी तुमच्या हाती आहे; तुम्हांला बरे व नीट दिसेल तसे माझे करा. एवढे मात्र पक्के समजा की, तुम्ही मला जिवे माराल तर तुम्ही आपणांवर, ह्या नगरावर व ह्यातील रहिवाशांवर निर्दोष रक्त पाडल्याचा दोष आणाल; कारण वास्तविक ही सर्व वचने तुमच्या कानी पडावीत म्हणून परमेश्वराने मला तुमच्याकडे पाठवले आहे.”

म्हणून “muth” हा शब्द खरोखर खून आणि “हत्या” साठी वापरला जातो, आणि “ratsach” हा शब्द अपघाती मृत्यूसाठीसुद्धा वापरला जातो. त्यामुळे हा दावा चुकीचा ठरतो की “muth” फक्त धर्मी वधासाठी आहे आणि “ratsach” फक्त खुनासाठी आहे.

शेवटी, हे कसेही परिभाषित केले तरी, खून आणि न्यायालयीन फाशी या दोन्ही ठिकाणी प्राणघातक शक्ती वापरली जाते. बळाचा वापर हा देवाच्या राज्याचा भाग आहे काय?

देवाचा गैरसमज झाल्यामुळे पृथ्वी अंधकारमय झाली होती. त्या उदास सावल्या दूर व्हाव्यात, जग पुन्हा देवाकडे वळावे, यासाठी सैतानाच्या फसवणुकीचे सामर्थ्य मोडले जाणे आवश्यक होते. हे बलाने करता येत नव्हते. बळाचा वापर हा देवाच्या राज्याच्या तत्त्वांना विरोध करणारा आहे; तो फक्त प्रेमाच्या सेवेला इच्छितो; आणि प्रेमाला आज्ञा करून uमिळवता येत नाही; ते बळाने किंवा अधिकाराने जिंकता येत नाही. फक्त प्रेमानेच प्रेम जागृत होते. देवाला जाणणे म्हणजे त्याच्यावर प्रेम करणे; देवाचा स्वभाव सैतानाच्या स्वभावाच्या विरोधात प्रकट व्हायला हवा. (DA 22)

आपण वरील विधानाचा अर्थ समजतो का? देव आपल्या राज्याचा भाग म्हणून प्राणघातक शक्तीचा वापर करू शकत नाही. आपण हे विधान प्रेरणा म्हणून स्वीकारतो का? उत्तर असे दिले जाते की आपण आपले शिक्षण शास्त्रातूनच घ्यायला हवे. मी असे सुचवतो की प्राणघातक शक्तीचा वापर करण्यास नकार देण्याचा सर्वात परिपूर्ण आदर्श म्हणजे येशूचे पृथ्वीवरील जीवन. आपण येशूचे शब्द स्वीकारतो काय?

मत्तय 5:39 “मी तर तुम्हांला सांगतो, दुष्टाला अडवू नका. जो कोणी तुझ्या उजव्या गालावर मारतो, त्याच्याकडे दुसरा गाल कर.”

येशूने हे आपल्या स्वभावाचा भाग म्हणून दाखवले काय? दुसरे म्हणजे, जर न्यायालयीन फाशी ही देवाच्या स्वभावाचा भाग असती, तर ती येशूच्या पृथ्वीवरील जीवनात प्रकट झाली असती. परंतु कुठेही असे दिसत नाही की त्याने एखाद्याचे आयुष्य काळजीपूर्वक तोलून पाहिले आणि मग त्याला मृत्युदंड देण्याचा आदेश दिला.

जो कोणी प्रभूला असे म्हणेल: “मी जुन्या करारात तुझ्या उदाहरणाचे अनुसरण केले जेव्हा मी या दुष्टाला ठार केले,” त्याला काय उत्तर दिले जाईल? असे सांगितले जाईल का: “तू चुकीचे उदाहरण अनुसरलेस, शास्त्रातील तो भाग तुझ्यासाठी अनुसरण करण्याचा नव्हता”? तुम्हाला दिसते का की यामुळे गोष्टी फारच कठीण होतात?

मी आशा करतो की तुम्ही अशा बिंदूपर्यंत पोहोचला आहात जिथे तुम्हाला हे दिसेल की जर आपण स्वतःला हे मान्य करू दिले की देव प्राणघातक शक्ती वापरतो आणि लोकांचा नाश करतो, तर शास्त्रात मोठे विरोधाभास उभे राहतात. जर आपण असे केले, तर आपल्याला गुडघे टेकून आपल्या पित्याला विचारण्याचे निमंत्रण आहे की हे दिसणारे विरोधाभास कसे समजावून सांगायचे. बायबल सरळ असे शिकवते की तो लोकांवर प्राणघातक शक्ती वापरतो; परंतु जर आपण हे स्वीकारले, तर संपूर्ण बायबलला एकत्रित करण्याच्या प्रयत्नात आपल्याला भयंकर संघर्षाला सामोरे जावे लागते.

## इस्राएलाची गणना

चला आपण त्या कथेशी सुरुवात करू जिथे दावीदने इस्राएलाची गणना केली. आपण खालील वचन कसे समजायचे? देवाने दावीदाला इस्राएलाची गणना करायला कसे प्रवृत्त केले?

2 शमुवेल 24:1 “परमेश्वराचा कोप इस्राएलावर पुनरपि झाला, आणि इस्राएल व यहूदा ह्यांची गणती करण्याची प्रेरणा देवाने त्यांच्याविरुद्ध दाविदाला केली.”

जर आपण ह्याच घटनेची दुसरी नोंद वाचली, तर आपल्याला असे दिसते:

1 इतिहास 21:1 “नंतर सैतानाने इस्राएलाविरुद्ध उठून इस्राएलाची गणती करायला दाविदाला प्रवृत्त केले.”

जर आपण फक्त 2 शमुवेल 24:1 वाचले आणि या वचनाचा सरळ अर्थ लावला, तर आपल्याला म्हणावे लागेल की देवानेच दावीदाला हे करायला प्रवृत्त केले, जेणेकरून 70,000 इस्राएली मारले जावेत. कोणताही विचार करणारा मनुष्य लगेचच विचारेल: हा विचार त्या देवाशी कसा जुळतो जो स्वतःला प्रेम म्हणतो?

या उताऱ्याच्या शब्दांमुळेच आपल्याला प्रश्न पडतो की देवाने खरोखर हे केले काय?

जे पुढे वाचण्याचा प्रयत्न करतात ते 1 इतिहास 21:1 शोधतील, ज्यात उघड होते की दावीदाला इस्राएलाची गणना करण्यासाठी सैतानाला मोह देण्याची परवानगी दिली गेली. मग आपल्याला या दोन वृत्तांत सुसंगती आणण्याचे निमंत्रण मिळते. आपण असा निष्कर्ष काढतो का की देव आणि सैतान यांनी एकत्र काम करून या इस्राएल लोकांचा नाश घडवून आणला? पुन्हा आपल्याला अधिक खोलवर जाऊन उत्तर शोधण्याचे आमंत्रण दिले जाते. ही प्रक्रिया लोकांच्या हृदयांची परीक्षा घेते की ते खरोखर मानतात का की देव एक प्रेमळ पिता आहे, एक अनिच्छुक न्यायाधीश आहे की एक निर्दयी अत्याचारी आहे. जे परमेश्वराच्या डोळ्यांत कृपा पाहतात ते धरून ठेवतील, जोपर्यंत ते या दोन वृत्तांत सुसंगती आणू शकत नाहीत. इतर फक्त विरोधाभास मान्य करून म्हणतील की देव प्रेमळ आहे, जरी तो या गोष्टी करीत असेल. आणि शेवटी काहीजण असे असतील जे स्वतःसाठी खात्री शोधत असतील की देव हा एक अत्याचारी आहे; ते मग शोध सोडून देतील आणि चौकशीच्या सुरुवातीलाच आपला निकाल जाहीर करतील. जेव्हा सूर्य आकाशात उंच उगवतो, तेव्हा त्यांच्या अंतःकरणातील बिया उथळपणा या दिसणाऱ्या विरोधाभासाच्या दडपणाखाली कोमेजून जातात.

पहिल्या आदामाची मुले म्हणून आपण देव कठोर आणि अत्याचारी आहे असा विश्वास वारशाने मिळवला आहे. आदामाला ही माहिती सैतानाकडून मिळाली. म्हणूनच आदाम बागेत पळून गेला आणि लपला. त्याला भीती वाटली की देव त्याच्या पापासाठी त्याला ठार करील, आणि ह्याच भीतीमुळे म्हणजे मृत्यूच्या भीतीमुळे सैतानाला आपल्यावर अधिकार मिळाला.

इब्री 2:14-15 "ज्या अर्थी 'मुले' एकाच रक्तमांसाची होती त्या अर्थी तोही त्यांच्यासारखा रक्तमांसाचा झाला, हेतू हा की, मरणावर सत्ता गाजवणारा म्हणजे सैतान, ह्याला मरणाने शून्यवत करावे, आणि जे मरणाच्या भयाने आयुष्यभर दास्याच्या बंधनात होते त्या सर्वांना मुक्त करावे."

देवाच्या लोकांची समज अंध झाली आहे, कारण सैतानाने देवाच्या स्वभावाचे चुकीचे चित्र दाखवले आहे. आपला चांगला आणि कृपाळू प्रभु लोकांसमोर सैतानाच्या गुणधर्मांनी झाकलेला दाखवला गेला आहे, आणि जे स्त्री-पुरुष सत्य शोधत आहेत त्यांनी इतक्या काळापर्यंत देवाला चुकीच्या प्रकाशात पाहिले आहे, की त्याच्या तेजाला झाकणारा ढग त्यांच्या दृष्टीतून दूर करणे कठीण झाले आहे. (1SM 355)

## पापाला वाढू देणे

आपला स्वर्गीय पिता आपल्या नैसर्गिक हृदयामध्ये कोरलेल्या या खोट्या आरोपांशी कसा वागतो?

रोमकरांस ५:२० “शिवाय अपराध वाढावा म्हणून नियमशास्त्राचा प्रवेश झाला; तरी जेथे पाप वाढले तेथे कृपा त्यापेक्षा विपुल झाली.”

आपला पिता अपराध वाढू देतो. तो हे कसे करतो? तो नियमशास्त्र येऊ देतो. जेव्हा ही व्यवस्था नैसर्गिक मनुष्यापाशी येते, तेव्हा तो हे नियमशास्त्र कसे वाचतो?

याकोब १:२३-२४ “कारण जर कोणी वचन नुसते ऐकून घेतो व त्याप्रमाणे आचरण करत नाही, तर तो आरशात आपले शारीरिक मुख पाहणाऱ्या माणसासारखा आहे; तो स्वत:ला पाहून तेथून निघून जातो आणि आपण कसे होतो हे तेव्हाच विसरून जातो.”

नैसर्गिक मनुष्य देवाचे वचन वाचतो, आणि जसा तो वाचतो, तसे देवाविषयीचे त्याचे नैसर्गिक विचार वाढतात. देव हा एक हुकूमशहा आहे ही त्याची नैसर्गिक कल्पना इतकी मोठी होते की त्याला एक निवड करावी लागते. जर तो वचनाचा करणारा झाला तर त्याला देवाचे वेगळे चित्र दिसू लागते, जे त्याच्या नैसर्गिक विचारांशी विसंगत असते. मग त्याला संधी दिली जाते की तो कृपेला वाढू

देईल, किंवा फक्त आपला मार्ग धरून निघून जाईल आणि आपण कसे मनुष्य आहोत हे विसरेल.

बायबल असे लिहिलेले आहे की मनुष्याचे नैसर्गिक विचार वाढू शकतील. तो स्वतःसाठी अशी खात्री शोधून काढतो की देव लोकांवर प्राणघातक शक्ती वापरतो आणि त्यांना नष्ट करतो. हा विश्वास नैसर्गिक मनुष्याचे विचार आणखी दृढ करतो आणि त्यांना विस्तारतो. पण हा विश्वास मग येशूच्या जीवनाच्या प्रकटीकरणाने आव्हानासमोर येतो आणि पाप्याला देवपुत्राच्या प्रकटीकरणाद्वारे पित्याच्या प्रकाशात येण्यासाठी आमंत्रित केले जाते. हाच योहान १६:८ चा अर्थ आहे. पवित्र आत्मा आपल्याला प्रथम पापाची आणि नंतर धार्मिकतेची खात्री पटवतो. एका स्थितीतून दुसऱ्या स्थितीत जाणे म्हणजे संघर्ष असतो, कारण शरीर आत्म्याविरुद्ध युद्ध करते. पण जर आत्मा येशू ख्रिस्ताच्या चेहऱ्यात देवाचे प्रेम पाहतो, तर तो प्राणघातक शक्तीचा वापर हा देवाच्या राज्याचा एक भाग आहे हा शारीरिक विचार सोडून देतो. यामध्ये एक अद्भुत गोष्ट आहे. जे लोक देवाच्या वचनाची तलवार धरतात त्यांचा जुना मनुष्य असलेला देवाविषयीचा दृष्टिकोन त्या तलवारीने मारला जातो ते त्या तलवारीने मरतात. पण जे लोक जुन्या मनुष्याच्या स्थितीत राहतात आणि देव प्रत्यक्ष तलवार वापरतो असे बचाव करतात ते त्या तलवारीसह मरतील. कारण जे तलवार उचलतात ते सर्व तलवारीने मरतील. आपण सर्वजण एखाद्या तरी तलवारीने मरू. मग तुम्ही कुठल्या तलवारीने मराल?

मग सैतानाने दावीदाला कसे फसवले?

दावीदाने, आपल्या भरभराटीच्या काळात, आपल्या आयुष्याच्या सुरुवातीला असलेली ती नम्र वृत्ती आणि देवावरील विश्वास जपला नाही. त्याने राजसिंहासनावर आरूढ होण्याकडे अभिमानाने पाहिले आणि त्यांच्या तेव्हा असलेल्या समृद्ध अवस्थेची तुलना त्याने गादीवर बसताना असलेल्या अल्पसंख्यक व दुर्बल अवस्थेशी केली, आणि स्वतःस गौरव दिला. त्याने इस्राएलांची गणना करण्याच्या सैतानाच्या प्रलोभनाला शरण जाऊन आपल्या महत्त्वाकांक्षी भावनांना तृप्त केले, जेणेकरून तो त्यांच्या पूर्वीच्या कमजोरीची

तुलना त्यांच्या त्यावेळच्या समृद्ध स्थितीशी करू शकेल. हे देवाला अप्रिय होते आणि त्याच्या स्पष्ट आज्ञेविरुद्ध होते. यामुळे इस्राएलांनी जिवंत देवाऐवजी आपल्या संख्येच्या बळावर विसंबून राहायला सुरुवात केली असती. {१SP ३८५.१}

मग देव दावीदाविरुद्ध कसा कार्यरीत झाला?

आपल्या स्वतःच्या नावाच्या गौरवामुळे देव आपल्या इच्छेविरुद्ध काम करणाऱ्यांचे रक्षण करू शकत नाही. {८T ५१}

दावीद इस्राएलच्या वाढत्या सामर्थ्याबद्दल असलेल्या या अभिमानाच्या भावनेत एकटाच नव्हता.

अन्यजातींशी झालेल्या संबंधांमुळे त्यांच्या राष्ट्रीय प्रथांचे अनुसरण करण्याची इच्छा निर्माण झाली आणि सांसारिक महानतेसाठी महत्त्वाकांक्षा प्रज्वलित झाली. यहोवाचे लोक म्हणून इस्राएलाचा सन्मान व्हायला हवा होता; पण अभिमान आणि आत्मविश्वास जसजसा वाढत गेला, तसतसे इस्राएली या श्रेष्ठत्वावर समाधान मानू शकले नाहीत. त्यांना इतर राष्ट्रांमध्ये आपले स्थान कसे आहे याची अधिक काळजी वाटू लागली. ही वृत्ती निश्चितच प्रलोभनाला आमंत्रण देणारी होती. {PP 746, 747}

जरी परमेश्वराने योआबामार्फत दावीदाला चेतावणी दिली, तरी देवाने दावीदावरील संरक्षण काढून घेतले आणि सैतानाला दावीदाला आणखी प्रलोभना देण्यास मुभा दिली. दावीदाने आत्म्याच्या प्रेरणांना विरोध केला आणि आपल्या नैसर्गिक प्रवृत्तीच्या मार्गाने गेला. असे केल्यामुळे सैतान इस्राएलाभोवती असलेल्या देवदूतांच्या संरक्षणभिंतीला तोडण्यात यशस्वी झाला. न्याय कसा येतो याची ही प्रक्रिया आहे:

“मला दाखविण्यात आले की देवाचा न्याय थेट प्रभूकडून त्यांच्यावर येत नाहीत, तर तो ह्या प्रकारे येतो: ते स्वतःला त्याच्या संरक्षणाच्या बाहेर ठेवतात. तो चेतावणी देतो, दुरुस्त करतो, ताडना करतो आणि सुरक्षिततेचा एकमेव मार्ग दाखवतो; पण ज्यांच्यावर त्याची विशेष काळजी आहे, ते जर

वारंवार दिलेल्या चेतावणीनंतरही देवाच्या आत्म्यापासून स्वतंत्रपणे आपला मार्ग निवडतात, तर मग तो आपल्या देवदूतांना सैतानाचे ठरवून केलेले आक्रमण थांबवण्यासाठी नियुक्त करत नाही.” {14MR 3}

हे अपूर्ण विधान नाही. यात स्पष्ट म्हटले आहे की “देवाचा न्याय थेट प्रभूकडून त्यांच्यावर येत नाही.” इथे निश्चित लेखाचा वापर आहे, काही न्याय असे विशेषण न वापरता. यामुळे हे स्पष्ट होते की हा एक सातत्यपूर्ण तत्त्व आहे आणि बायबल मनुष्यांवर न्याय कसा येतो हे सांगते त्याशी हे पूर्णपणे जुळते. दहा आज्ञा हे नेमके कसे कार्य करते ते स्पष्ट करतात:

निर्गम २०:५-६ “त्यांच्या पाया पडू नकोस किंवा त्यांची सेवा करू नकोस; कारण मी तुझा देव परमेश्वर ईर्ष्यावान देव आहे; जे माझा द्वेष करतात त्यांच्या मुलांना तिसऱ्या-चौथ्या पिढीपर्यंत वडिलांच्या अन्यायाबद्दल मी शासन करतो; आणि जे माझ्यावर प्रेम करतात व माझ्या आज्ञा पाळतात अशांच्या हजारो पिढ्यांवर मी दया करतो.”

निर्गम ३४:७ “हजारो जणांवर दया करणारा, अन्याय, अपराध व पाप ह्यांची क्षमा करणारा, (पण अपराधी जनांची) मुळीच गय न करणारा, असा तो वडिलांच्या दुष्टाईबद्दल पुत्रपौत्रांचा तिसऱ्या व चौथ्या पिढीपर्यंतही समाचार घेतो.”

## साथरोग हा शत्रूचा ठसा आहे

२ शमुवेल २४:१५ “मग परमेश्वराने इस्राएलात सकाळपासून नेमलेल्या मुदतीपर्यंत मरी पाठवली; आणि दानापासून बैर-शेब्यापर्यंतच्या लोकांपैकी सत्तर हजार लोक मेले.”

“पाठवली” या शब्दासाठी वापरलेला मूळ हिब्रू शब्द नाथान आहे. याचा अर्थ “देणे” किंवा कधी कधी “सोपवणे/सोडून टाकणे” असा होतो. आता देवाच्या कराराशी संबंधित रोगराईच्या संदर्भात पुढील वचन नीट पाहा:

लेवीय २६:२५ “मी तुमच्यावर तलवार आणीन, ती करार मोडल्याचा बदला घेईल; तुम्ही आपापल्या नगरात जमा व्हाल, तेव्हा मी तुमच्यावर मरी पाठवीन; मी तुम्हांला तुमच्या शत्रूच्या स्वाधीन [H5414] करीन.”

येथे नाथान हा शब्द “स्वाधीन करीन” असा भाषांतरित केला आहे. या वचनाच्या शेवटच्या भागाकडे नीट लक्ष द्या. ते आपल्याला सहज वाचता येईल:

“मी तुमच्यावर मरी पाठवीन; मी तुम्हांला तुमच्या शत्रूच्या स्वाधीन [H5414] करीन.”

याचा अर्थ असा की रोगराई जेव्हा येते तेव्हा ते यासाठी असते की लोक शत्रूच्या हाती सोपवले गेलेले असतात.

स्तोत्र ९१:१-३ “जो परात्पराच्या गुप्त स्थली वसतो, तो सर्वसमर्थाच्या सावलीत राहील. परमेश्वराला मी “माझा आश्रय, माझा दुर्ग” असे म्हणतो; “तोच माझा देव, त्याच्यावर मी भाव ठेवतो.” कारण तो पारध्याच्या पाशापासून घातक मरीपासून तुझा बचाव करील.”

…सैतान आपली शक्ती चालवत आहे. तो पिकणारी शेते उध्वस्त करतो, आणि दुष्काळ व दुःख यातून येतो. तो हवेत घातक विषारी प्रभाव सोडतो, आणि हजारो लोक रोगराईने मरतात. {GC 590}

ही लोकं नष्ट करण्याची परवानगी सैतानालाच देण्यात आली होती. दुसरा पर्याय असा असेल की देवाने सैतानाला दावीद आणि इस्राएलाला पापात पाडण्यासाठी प्रलोभन देण्याची मुभा दिली, आणि मग स्वतः देव फिरून ७०,००० लोकांचा नाश करतो. पण अशी भूमिका सुसंगत नाही. सैतान उभा राहिला आणि त्याला दावीदाला फसवण्याची परवानगी मिळाली, कारण दावीद देवाच्या इच्छेनुसार वागत नव्हता. जेव्हा दावीद या प्रलोभनाला शरण गेला, तेव्हा यामुळे सैतानाला इस्राएलावर अधिक अधिकार मिळाला आणि त्याला

त्यांच्यात रोगराई आणण्याची मुभा मिळाली. तरीही, हे स्पष्टीकरण त्या भागाला पूर्णपणे स्पष्ट करत नाही जिथे इस्राएल लोकांना मारणाऱ्या देवदूताचा उल्लेख आहे:

२ शमुवेल २४:१६-१७ “पण देवदूताने यरुशलेमेचा नाश करण्यासाठी त्यावर आपला हात उगारला तेव्हा परमेश्वराला त्या अरिष्टाविषयी वाईट वाटले, व त्याने लोकांचा नाश करणाऱ्या देवदूतास म्हटले, “आता पुरे कर, आपला हात आटोप.” त्या वेळी परमेश्वराचा दूत अरवना यबूसी ह्याच्या खळ्यानजीक होता. लोकांचा नाश करणारा देवदूत दाविदाच्या दृष्टीस पडला तेव्हा त्याने परमेश्वराला म्हटले, “पाहा, मी पाप केले, मी दुर्मार्गानेही चाललो, पण ह्या मेंढरांनी काय केले? तुझा हात माझ्यावर व माझ्या पितृकुळावर पडावा.’”

सैतान हा प्रतिनिधी होता ज्याने रोगराई आणली. पण मग १ इतिहास २१:१६ मध्ये यरुशलेमवर पसरविलेल्या परमेश्वराच्या देवदूताच्या तलवारीचे काय? देवपुत्र कोणती तलवार वापरतो?

## देवपुत्राची तलवार

प्रकटीकरण १:१६-१७ “त्याच्या उजव्या हातात सात तारे होते; त्याच्या तोंडातून तीक्ष्ण दुधारी तलवार निघाली आणि त्याची मुद्रा ‘परमतेजाने’ प्रकाशणाऱ्या ‘सूर्यासारखी’ होती. मी त्याला पाहिले तेव्हा मी मेल्यासारखा त्याच्या पायांजवळ पडलो. मग त्याने आपला उजवा हात माझ्यावर ठेवून मला म्हटले, “भिऊ नकोस; जो पहिला व शेवटला, आणि जो जिवंत तो मी आहे;”

येथे आपण पाहतो की प्रेषित योहानाची काय प्रतिक्रिया झाली जेव्हा त्याने देवपुत्राचे तेजस्वी मुख आणि त्याच्या तोंडातून बाहेर येणारी तलवार पाहिली. पण ती तलवार नेमकी काय होती?

इब्री ४:१२ “कारण देवाचे वचन सजीव, सक्रिय, कोणत्याही दुधारी तलवारीपेक्षा

तीक्ष्ण असून, जीव व आत्मा, सांधे व मज्जा ह्यांना भेदून आरपार जाणारे आणि मनातील विचार व हेतू ह्यांचे परीक्षक असे आहे."

मग, आपल्या कडे असे काही उदाहरण आहे का की ही तलवार ख्रिस्ताने प्रत्यक्षात कशी वापरली?

ते दृश्य पाहत असताना त्याच्या चेहऱ्यावर संताप, अधिकार आणि सामर्थ्य प्रकट झाले. लोकांचे लक्ष त्याच्याकडे खेचले गेले. जे आपल्या अपवित्र व्यापारात गुंतलेले होते त्यांचे डोळे त्याच्या चेहऱ्यावर खिळून राहिले. ते नजर हटवू शकले नाहीत. त्यांना वाटले की हा मनुष्य त्यांच्या अंतःकरणातील सर्वात गुप्त विचार वाचत आहे आणि त्यांचे लपलेले हेतु उघड करत आहे. काहींनी आपली चेहरे झाकण्याचा प्रयत्न केला, जणू त्यांची दुष्ट कर्मे त्यांच्या चेहऱ्यावर कोरलेली होती आणि ती त्या शोधक डोळ्यांनी तपासली जात होती.

गोंधळ थांबला. खरेदी-विक्रीचा गजबजाट संपला. शांतता इतकी गडद झाली की ती असह्य झाली. आदरयुक्त भीतीची भावना त्या मंडळीवर पसरली. जणू ते देवाच्या न्यायासनापुढे आपल्या कृत्यांचा हिशोब देण्यासाठी उभे आहेत. ख्रिस्ताकडे पाहताना त्यांना मानवतेच्या आवरणातून झळकणारे दैवीपण दिसले. स्वर्गाचा राजाधिराज न्यायासनावर उभा राहील तसा तो उभा होता तेव्हा त्याच्यासोबत भविष्यात असणाऱ्या गौरवाने वेढलेला नव्हता, पण आत्म्याला वाचण्याचे तेच सामर्थ्य त्याच्याकडे होते. त्याचे डोळे संपूर्ण जमावावर फिरले आणि प्रत्येक व्यक्तीकडे गेले. त्याचे रूप आदेश देणाऱ्या गौरवात उंचावलेले दिसले आणि त्याच्या चेहऱ्यावर दैवी प्रकाश झळकत होता. तो बोलला, आणि त्याचा तो स्पष्ट, घणघणीत आवाज तोच आवाज ज्याने सिनाय पर्वतावर नियमशास्त्र जाहीर केले होते, तोच आता याजक आणि शासक ह्यांना तोडत होता तो मंदिराच्या कमानींमध्ये घुमू लागला: "ही वस्तू इथून काढून टाका; माझ्या पित्याचे घर व्यापाराचे घर करू नका."

हळूहळू पायऱ्या उतरून, आणि आत येताना त्याने जमवलेली दोऱ्यांची चाबूक उचलून, त्याने व्यापार करणाऱ्या लोकांना मंदिराच्या आवारातून निघून जाण्याची आज्ञा केली. अशा एका जोमाने आणि कठोरतेने, जी त्याने याआधी

कधी दाखवली नव्हती, त्याने सावकारांच्या बाकड्यांना उलथून टाकले. [निर्जीव वस्तूंवर शक्ती वापरली] नाणी वाजत संगमरवरी फरशीवर विखुरली. कुणीही त्याच्या अधिकाराला आव्हान द्यायची हिंमत केली नाही. कुणीही आपला अन्यायाने मिळवलेला पैसा उचलण्यासाठी थांबायची हिंमत केली नाही. येशूने लोकांना त्या दोऱ्यांच्या चाबकाने मारले नाही, पण त्याच्या हातातला तो साधा चाबूक ज्वलंत तलवारीसारखा भासत होता. [त्याने लोकांवर शक्ती वापरली नाही] मंदिरातील अधिकारी, नफा मिळवणारे याजक, सावकार आणि गुरांचे व्यापारी, आपली मेंढरे व बैल घेऊन पळाले त्यांना फक्त एकच विचार होता, त्याच्या उपस्थितीतून येणाऱ्या दोषारोपापासून सुटका करावी.

एक घबराट संपूर्ण जमावावर पसरली, कारण त्यांना त्याच्या दैवीपणाची छाया जाणवली. शेकडो पांढरट ओठांतून भीतीचे आक्रोश बाहेर पडले. अगदी शिष्यसुद्धा थरथर कापले. ते येशूच्या शब्दांनी आणि वर्तनाने भयचकित झाले, जे त्याच्या नेहमीच्या सौम्य स्वभावापेक्षा पूर्णपणे वेगळे होते. {da 157, 158}

त्या ७०,००० लोकांसाठी ज्यांनी नाश करणाऱ्याच्या कोपाचा सामना केला, देवाचा आत्मा त्यांच्या पापाची खोल खात्री करून त्यांच्या जवळ आला, जेणेकरून त्यांनी पश्चात्ताप करावा. या खोल खात्रीचे कार्य तातडीचे होते, कारण जर त्यांनी आत्म्याच्या कार्याला नाकारले तर ते पूर्णपणे संरक्षणाविना राहतील आणि नाश करणाऱ्या सैतानाचा सामना करतील. मंदिर शुद्धीकरणाच्या प्रसंगी जसे लोक त्याच्या उपस्थितीतून पळून गेले तसेच, त्या ७०,००० लोकांच्या बाबतीतही घडले ते येशूच्या उपस्थितीतून पळाले आणि थेट सैतानाच्या वाट पाहणाऱ्या मिठीत गेले, ज्याने त्यांना रोगराईने मारले. त्यांनी आपल्या पापांचा पश्चात्ताप करून देवाची क्षमा मागू शकली असती, पण त्यांनी त्याच्या उपस्थितीतून पळ काढला आणि त्याचा परिणाम म्हणजे मृत्यू झाला.

हीच प्रक्रिया अगदी तशीच आहे जशी देवाने कनानी लोकांबाबत सांगितली

होती:

निर्गम २३:२७-२८ “ज्या ज्या लोकांच्या विरुद्ध तू जाशील त्यांना मी आधीच दहशत घालून त्यांची फसगत करीन. तुझ्या सर्व शत्रूंना पाठ दाखवायला लावीन. मी तुझ्यापुढे गांधीलमाशा पाठवीन; त्या हिव्वी, कनानी आणि हित्ती ह्यांना तुझ्यापुढून पळायला लावतील.”

येथे “भीती पाठविणे” म्हणजे पापाची ती खात्री होय, जी दुष्टांना भयभीत करते. आणि गांधीलमाशा म्हणजे दोषी अंतःकरणाच्या टोचणी, ज्यांना अपराधीपणाने व्याकुळ करून देवाच्या उपस्थितीतून बाहेर हाकलले जाते आणि शत्रूच्या हाती सोपवले जाते. पण जर त्यांनी पश्चात्ताप केला असता आणि लहान मुलांसारखे झाले असते, तर ते वाचले असते.

मंदिरातून सगळेजण बाहेर गेले नाहीत, तरीही प्रत्येकाने तलवारीचा परिणाम अनुभवला. जेव्हा ते पळाले, तेव्हा गरीब लोक मागे राहिले; आणि आता हे गरीब येशूकडे पाहत होते, ज्याच्या चेहऱ्यावर प्रेम आणि सहानुभूती प्रकट होत होती. डोळ्यांत अश्रू घेऊन त्याने थरथरणाऱ्यांना म्हटले: “घाबरू नका; मी तुम्हाला सोडवीन, आणि तुम्ही मला गौरव द्याल. ह्याच कारणासाठी मी जगात आलो आहे.” लोक तातडीच्या विनवण्यांनी ख्रिस्ताकडे आले: “प्रभू, आम्हाला आशीर्वाद दे.” त्याच्या कानांनी प्रत्येक आक्रोश ऐकला. अतिशय कोमल आईच्या दयेपेक्षाही अधिक करुणेने तो दु:खित लहान लेकराणंपाशी वाकला. प्रत्येकाला लक्ष दिले गेले. प्रत्येक ज्या आजाराने पीडित होता त्यापासून बरा झाला. मुके आपल्या ओठांनी स्तुती करू लागले; आंधळ्यांनी आपल्या पुनर्स्थापकाचा चेहरा पाहिला. दु:खी लोकांच्या अंत:करणात आनंद भरला. {DA 163}

म्हणून आपण इस्राएलाची गणना करण्याच्या घटनेत पाहतो की सैतानाच्या हाती पडणाऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी शेवटच्या प्रयत्नात देवाचा आत्मा त्यांच्या जवळ आला आणि त्यांच्या अंत:करणांना पापापासून शुद्ध करण्याची इच्छा त्याने केली, जेणेकरून ते तारले जावेत. पण जेव्हा त्यांनी नकार दिला, तेव्हा येशूने ते दुःखद शब्द उच्चारले: “तुमचे घर तुमच्याकडे ओसाड सोडले

गेले आहे.” हिब्रू भाषेत “तलवार” या शब्दाचा मूळ अर्थ प्रत्यक्षात “दुष्काळ” असा आहे, आणि जेव्हा आत्मा पूर्णपणे ख्रिस्ताला विरोध करतो, त्याला आत येण्यास नकार देतो, तेव्हा ख्रिस्ताला त्यांना सैतानाच्या हाती सोपवणे भाग पडते.

हे देखील लक्षात घ्या की या लोकांची अंतःकरणे सैतानाच्या ताब्यात होती. ख्रिस्त शेवटच्या वेळेस त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत होता. पण सैतान आपल्या शिकार गमविण्यास तयार नव्हता. आणि जेव्हा मानवी अंतःकरणाने ख्रिस्ताला प्रवेश नाकारला, तेव्हा सैतानाने या आत्म्यांना पकडून ठेवण्यासाठी त्यांच्या प्राणांचा बळी घेतला, कारण अन्यथा त्यांना आपल्या पापांचा पश्चात्ताप करण्याचा धोका होता. आपल्याला या प्रकरणाचे नेमके सर्व तपशील ठाऊक नाहीत, पण हे तत्त्व समजणे अवघड नाही.

मग आरोप असा होतो की: “तुम्ही शास्त्रातील मजकुरांचे आध्यात्मिकीकरण करता आहात.” बायबलमध्ये “तलवार” हा शब्द आहे, तर आपण त्याला शाब्दिक धरायला हवे. पण पहिल्यांदा, लोक रोगराईमुळे मेले. ते देवदूताच्या हातातील प्रत्यक्ष शारीरिक तलवारीने मेले नाहीत. दुसरे म्हणजे, आपल्याला शक्य तितके सर्व पुरावे एकत्र करायचे आहेत आणि मग निष्कर्ष काढायचा आहे. या मुद्द्यावर विल्यम मिलरचा नियम ११ नीट पाहा:

एखादा शब्द लाक्षणिक अर्थाने वापरला आहे की नाही हे कसे ओळखावे? जर त्याचा सरळ अर्थ घेतल्यावर त्याचा चांगला अर्थ लागत असेल आणि तो निसर्गाच्या साध्या नियमांना धक्का पोहोचवत नसेल, तर तो शाब्दिक आहे. अन्यथा, तो लाक्षणिक अर्थाने आहे.

लोक रोगराईमुळे नाश पावले असल्याने, देवदूताच्या हातातील तलवारीचा उद्देश काही वेगळा असला पाहिजे. बायबल आपल्याला अनेक ठिकाणी सांगते की ख्रिस्त जी तलवार वापरतो ती म्हणजे देवाचे वचन आहे. आपण वर्णन केले आहे की देवदूताने लोकांना तलवारीने मारले आणि तरी ते रोगराईमुळे मेले. म्हणजेच, ती तलवार म्हणजे लोकांच्या अंतःकरणाला दोषी ठरवणारे देवाचे वचन होते. ह्याच प्रकारे परमेश्वराच्या देवदूताने त्यांना

मारले. पण त्यांनी या तलवारीद्वारे स्वतःच्या स्वार्थाला मरण पत्करायला नकार दिला, म्हणून देवाचा आत्मा त्यांना सोडून गेला आणि नाश करणाऱ्याने त्यांच्या प्राणांचा नाश केला. हे पूर्णपणे त्या प्रेरणेप्रमाणेच सुसंगत आहे जी आपल्याला सांगितली गेली आहे.

या काळात देवाविषयी नेहमीपेक्षा अधिक तुच्छता दाखवली जात आहे. माणसे उद्धटपणात आणि अवज्ञेत अशा टप्प्यापर्यंत पोहोचली आहेत की ज्यावरून दिसून येते की त्यांच्या अधर्माचा प्याला जवळजवळ पूर्ण भरला आहे. अनेक जण जवळपास दयेच्या सीमारेषेपलीकडे गेले आहेत. लवकरच देव दाखवेल की तो खरोखरच जिवंत देव आहे. तो देवदूतांना सांगेल: "आता सैतानाशी त्याच्या नाश करण्याच्या प्रयत्नांत लढू नका. त्याला अवज्ञेच्या मुलांवर तो आपला दुष्टपणा प्रकट करू दे; कारण त्यांच्या अधर्माचा प्याला भरून गेला आहे. त्यांनी एका पातळीवरून दुसऱ्या पातळीवर दुष्टपणात प्रगती केली आहे, रोज आपल्या कायद्यभंगात भर घालत आहेत. आता मी नाश करणाऱ्याला त्याचे कार्य करण्यापासून थांबवण्यासाठी हस्तक्षेप करणार नाही." {RH, September 17, 1901}

आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की येशूने जेव्हा बोलले त्या शब्दांचा प्रतीकात्मक अर्थ स्वीकारण्यास ऐकणाऱ्यांनी नकार दिला, आणि त्याऐवजी शब्दशः अर्थ घेतला ज्यामुळे तो अत्यंत हिंसक आणि अप्राकृतिक वाटत होता, तेव्हा ते चुकीचे ठरले.

योहान ६:५३-५५ "ह्यावरून येशू त्यांना म्हणाला, "मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, तुम्ही मनुष्याच्या पुत्राचा देह खाल्ला नाही व त्याचे रक्त प्याला नाही तर तुमच्यामध्ये जीवन नाही; जो माझा देह खातो व माझे रक्त पितो, त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे; आणि मीच त्याला शेवटल्या दिवशी उठवीन. कारण माझा देह खरे खाद्य व माझे रक्त खरे पेय आहे."

यावर बऱ्याच लोकांची प्रतिक्रिया अशी होती:

योहान ६:६६ “ह्यावरून त्याच्या शिष्यांपैकी पुष्कळ जण परत गेले आणि ते पुन्हा कधी त्याच्याबरोबर चालले नाहीत.”

आपण जुन्या करारातील या कथांना प्रतिसाद देताना असा ६६६ प्रतिसाद देणार आहोत काय? आणि मिलरचे नियम योग्य रीतीने न लावता, निसर्गाच्या नियमांवर हिंसा करणार आहोत का? ही तत्त्वे लक्षात घेऊन आता पुढील कथेकडे वळूया जिथे एका देवदूताने १,८५,००० अश्शूर सैनिकांना मारले.

## अश्शूराच्या सैन्याचा नाश

२ राजे १९:३५ “त्या रात्री असे झाले की परमेश्वराच्या देवदूताने जाऊन अश्शूरी गोटातले एक लक्ष पंचाऐंशी हजार लोक मारले; पहाटेस लोक उठून पाहतात तर सर्व प्रेतेच प्रेते!”

हे नीट लक्षात घ्या येथे असे लिहिले आहे की “परमेश्वराच्या देवदूताने त्यांना मारले आणि सकाळी ते मृत आढळले.” असे कुठेही म्हटलेले नाही की परमेश्वराच्या देवदूताने त्यांना मारले आणि ते लगेच मृत्यू पावले. प्रेरितवचनाचा आत्मा आपल्याला सांगतो की हे सैनिक मारले गेले तेव्हा नेमके काय घडले:

“जसे येणाऱ्या सैन्याचा आवाज ऐकू आला, जरी ते अजून दिसलेही नव्हते, तरी धर्मयोध्यांवर पुन्हा एकदा भयंकर घबराट पसरली. राजे, सेनापती आणि सामान्य सैनिक, आपली कवच फेकून देऊन सर्व दिशांनी पळून गेले. आक्रमणाचे नेतृत्व करणारा दूत आपले भयभीत आणि विस्कळीत सैन्य एकत्र आणण्याचा व्यर्थ प्रयत्न करत होता. त्याच्या सर्वतोपरी प्रयत्नांनाही न जुमानता, तो स्वतः त्या पळून जाणाऱ्यांच्या लाटेत वाहून गेला. पराभव संपूर्ण झाला, आणि पुन्हा एकदा प्रचंड लुट जिंकणाऱ्यांच्या हाती पडली. अशा रीतीने, दुसऱ्यांदा, युरोपातील सर्वात बलवान राष्ट्रांनी पाठवलेले, युद्धासाठी प्रशिक्षित व सज्ज शूर, लढाऊ पुरुषांचे विशाल सैन्य, एका लहान आणि आतापर्यंत दुर्बल

असलेल्या राष्ट्राच्या रक्षणकर्त्यांसमोर, एकही वार न करता पळाले. हे दैवी सामर्थ्याचे प्रकटीकरण होते. आक्रमणकर्त्यांना अलौकिक भयाने ग्रासले. ज्याने फारोचे सैन्य लाल समुद्रात उलथून टाकले, ज्याने गिदोन आणि त्याच्या तीनशे माणसांसमोर मिद्यानी सैन्य पळवून लावले, ज्याने एका रात्रीत गर्विष्ठ अश्शूरांचे सैन्य नामोहरम केले त्याने पुन्हा एकदा आपला हात पसरवून दडपशाही करणाऱ्याचे सामर्थ्य कोमेजवून टाकले." "पूर्वी कधीही भ्याले नव्हते इतके ते भेदरले आहेत; कारण तुझ्याविरुद्ध छावणी देऊन बसणाऱ्यांची हाडे देवाने विखरली आहेत; तू त्यांची फजिती केली आहेस, कारण देवाने त्यांचा धिक्कार केला आहे." स्तोत्र ५३:५. {GC 117}

मिसरी, मिद्यानी आणि अश्शूरी यांची कथा एकत्र ठेवली आहे, आणि त्या तिन्ही ठिकाणी दैवी सामर्थ्याचे असे प्रकटीकरण झाले ज्यामुळे अलौकिक भीती निर्माण झाली. ही भीती म्हणजे आत्म्यातील पापाची खात्री, जसा आत्मा त्यांना पश्चात्तापाकडे आणण्याचा प्रयत्न करतो आणि त्यांना त्यांच्या दुष्ट कृत्यांपासून वळवतो. जेव्हा ही तलवार पडते, तेव्हा ती सैनिकांना मेलेल्यासारखे पाडते.

मत्तय २८:२-४ "तेव्हा पाहा, मोठा भूमिकंप झाला; कारण प्रभूचा दूत स्वर्गातून उतरला, त्याने येऊन धोंड एकीकडे लोटली आणि तिच्यावर तो बसला. त्याचे रूप विजेसारखे होते व त्याचे वस्त्र बर्फासारखे शुभ्र होते. त्याच्या भयाने पहारेकरी थरथर कापले व मृतप्राय झाले.

"'तुम्ही कोणाला शोधता?' त्यांनी उत्तर दिले, 'येशू नासरी.' येशू म्हणाला, 'मी तोच आहे.' हे शब्द जसे उच्चारले गेले, तसे तो देवदूत, जो अलीकडे येशूची सेवा करत होता, त्याच्यामध्ये आणि जमावामध्ये उभा राहिला. एक दैवी प्रकाश तारणाऱ्याच्या चेहऱ्यावर झळकला, आणि कबुतरासारखी आकृती त्याच्यावर पसरली. या दैवी गौरवाच्या उपस्थितीत ते खून करणारे लोक एक क्षणही उभे राहू शकले नाहीत. ते मागे ढकलले गेले. याजक, ज्येष्ठ, सैनिक आणि अगदी यहूदा देखील, मेलेल्यासारखे जमिनीवर कोसळले." {DA 694.5}

आपल्याला हे माहीत आहे की ज्यांनी येशूच्या थडग्याची राखण केली ते

सैनिक त्यांच्या भीतीने मेले नाहीत, कारण ते जाऊन यहूदी नेत्यांना अहवाल देऊ शकले.

मत्तय २८:१२-१५ “तेव्हा त्यांनी व वडिलांनी मिळून मसलत केली आणि शिपायांना पुष्कळ पैसे देऊन सांगितले की, “‘आम्ही झोपेत असताना त्याच्या शिष्यांनी रात्री येऊन त्याला चोरून नेले,’ असे म्हणा; आणि ही गोष्ट सुभेदाराच्या कानावर गेली तर आम्ही त्याची समजूत घालून तुम्हांला निर्धास्त करू.” मग त्यांनी पैसे घेऊन शिकवल्याप्रमाणे केले; आणि ही जी गोष्ट यहूदी लोकांमध्ये पसरवण्यात आली, ती आजपर्यंत चालू आहे.”

धर्मी दानिएलाने जेव्हा देवदूत गॅब्रिएलला पाहिले, तेव्हा तो त्याच्या पायांपाशी मेलेल्यासारखा पडला, आणि गॅब्रिएलने त्याला उचलून त्याला आपल्या उपस्थितीत उभे राहण्यासाठी बळ दिले.

दानिएल १०:८-११ “मग मी एकटाच राहिलो व हा मोठा दृष्टान्त पाहिला; माझ्यात काही त्राण उरले नाही. मी निस्तेज होऊन मृतप्राय झालो; मला काहीच शक्ती राहिली नाही. तरी त्याच्या शब्दांचा ध्वनी माझ्या कानी पडला; मी त्याच्या शब्दांचा ध्वनी ऐकला तेव्हा मी भूमीवर पालथा पडलो व मला गाढ झोप लागली. तेव्हा पाहा, एका हाताने मला स्पर्श केला, त्याच्या योगाने मी गुडघे व तळहात जमिनीवर टेकून थरथरत राहिलो. तो मला म्हणाला, “हे दानिएला, परमप्रिय पुरुषा, मी तुला सांगतो ते शब्द समजून घे; नीट उभा राहा; कारण मला आता तुझ्याकडे पाठवले आहे;” तो माझ्याबरोबर असे बोलला तेव्हा मी थरथर कापत उभा राहिलो.”

पवित्र देवदूताच्या उपस्थितीत दानिएलाच्या मानवी पापी स्वभावाचे खरे वास्तव उघड झाले आणि त्याचे वैभव, त्याचा स्वभाव, देवदूताच्या तुलनेत अद्याप भ्रष्ट असल्याचे दिसून आले. जर हा अनुभव एका धार्मिक मनुष्यासाठी होता, तर मग दुष्टांविषयी आपण काय म्हणावे?

जेव्हा शरीराला भीषण धक्का बसतो तेव्हा रोगप्रतिकारक शक्तीवर मोठा ताण येतो, आणि जर हा ताण काही काळ टिकून राहिला, तर शरीर कोसळू लागते.

त्या १,८५,००० सैनिकांनी जेव्हा परमेश्वराचा देवदूताला पाहिले, तेव्हा त्यांच्या शरीराच्या संरक्षणशक्ती कमजोर झाल्या आणि ते आजारांना बळी पडले. इतिहासकार योसेफस सांगतो की त्यानंतर काय घडले.

५. “जेव्हा सेनाखेरिब आपल्या मिसरी युद्धातून यरुशलेमकडे परत येत होता, तेव्हा त्याला आढळले की त्याचे सैन्य, सेनापती रबशाकेच्या ताब्यात, संकटात होते [एका रोगामुळे]; कारण देवाने त्याच्या सैन्यावर रोगराई पाठवली होती. आणि वेढ्याच्या पहिल्या रात्रीच एक लाख पंच्याऐंशी हजार सैनिक, त्यांच्या आणि सरदारांसह, नष्ट झाले. त्यामुळे राजा या आपत्तीमुळे फार घाबरला आणि भयंकर यातनेत पडला; आणि संपूर्ण सैन्याच्या बाबतीत फार भीती वाटल्यामुळे, तो उरलेल्या सैन्यासह आपल्या राज्यात व निनवे या आपल्या शहरात पळून गेला; आणि तिथे थोडा काळ राहिल्यावर, त्याच्यावर विश्वासघाताने आक्रमण झाले, आणि त्याचा मृत्यू त्याच्या मोठ्या मुलांच्या (४) अद्रामेलेक आणि सेरासेर यांच्या हातून झाला, आणि तो आरास्के नावाच्या स्वतःच्या मंदिरात मारला गेला.”

योसेफस, Antiquities of the Jews, पुस्तक १०, अध्याय १, विभाग ५

याची पुष्टी प्रेरितवचनाच्या आत्म्यातूनही होते:

“मग परमेश्वराचा देवदूत बाहेर गेला, आणि अश्शूरांच्या छावणीत एक लाख पंच्याऐंशी हजारांना मारले; आणि त्यांनी सकाळी लवकर उठल्यावर पाहा, ते सर्व मृतदेह पडलेले होते.” [यशया ३७:३६] “वय, स्थान किंवा प्रभाव यापैकी काहीही आपल्यापैकी कुणालाही अकस्मात आजारपण आणि आपत्तीपासून वाचवू शकत नाही, जर परमेश्वर म्हणाला, ‘ते पूर्ण झाले.’” {16MR पृ. 16, 17}

सैनिकांनी अनुभवलेली ती अलौकिक भीती ही फक्त यामुळे होती की पवित्र देवदूताच्या उपस्थितीत आल्यावर त्यांच्या दुष्टपणाची खरी जाणीव त्यांना झाली. देवदूताने त्यांना मारण्याची गरज नव्हती; फक्त त्यांच्या समोर दिसणे पुरेसे होते. त्यांच्या स्वतःच्या पापांमुळे आणि अपराधीपणाच्या भावनेमुळे त्यांना तात्काळ असा भयंकर धक्का बसला. त्यामुळे त्यांच्या शरीराच्या

संरक्षणशक्ती कमजोर झाल्या, आणि संपूर्ण छावणीत रोगराई पसरली आणि ते मेले.

आपल्याला ठाऊक आहे की ख्रिस्ताच्या दुसऱ्या येण्याच्या वेळी दुष्ट त्याच्या येण्याच्या तेजाने नष्ट होतील. याचा अर्थ असा की ख्रिस्ताच्या स्वभावाचे प्रकटीकरण होईल, ज्यामुळे पाप्यांना भयंकर यातना होतील. ही यातना यासाठी येते कारण पापी पश्चात्ताप करायला नकार देतो. त्यांच्या हृदयांचा धीर भीतीने सुटतो. या प्रक्रियेचे एक वर्णन अपोक्रिफा मधील २ इस्द्रास या पुस्तकात नोंदवलेले आहे. हे पुस्तक अनेक ॲडव्हेंटिस्ट स्थापकांनी उद्धृत केले आहे, आणि एलेन व्हाइट यांनी म्हटले आहे की शहाण्यांनी शेवटच्या दिवसांत हे समजून घ्यावे. {15MR 66}

२ इस्द्रास १३:१०-११ "पण मी फक्त इतकेच पाहिले की त्याच्या तोंडातून जणू अग्नीचा झोत बाहेर गेला, त्याच्या ओठांतून ज्वालामुखीचा श्वास निघाला, आणि त्याच्या जिभेतून ठिणग्या व प्रचंड वादळ बाहेर पडले. (११) आणि हे सर्व एकत्र मिसळले अग्नीचा झोत, ज्वालामुखीचा श्वास, आणि मोठे वादळ आणि युद्धासाठी तयार असलेल्या जमावावर प्रचंड सामर्थ्याने पडले, आणि त्यांनी प्रत्येकाला जाळून टाकले, इतके की अचानक त्या अगणित जमावापैकी काहीही दिसले नाही, फक्त धूळ व धुराचा वास शिल्लक राहिला; आणि मी हे पाहिले तेव्हा मी घाबरलो."

२ इस्द्रास १३:१५ "आता मला या स्वप्नाचे अर्थ लावून दाखव."

२ इस्द्रास १३:३४-३८ "आणि एक अगणित जमाव एकत्र जमेल, जसे तू पाहिलेस, त्याच्याशी लढून त्याला जिंकण्याची इच्छा बाळगून. (३५) पण तो सियोन पर्वताच्या शिखरावर उभा राहील. (३६) आणि सियोन प्रकट होईल, आणि सर्व लोकांना दाखवला जाईल, तयार आणि बांधलेला, जसा तू हातांनी न कोरलेला डोंगर पाहिलास. (३७) आणि हा माझा पुत्र त्या राष्ट्रांच्या दुष्ट शोधांना फटकारेल, जे त्यांच्या दुष्ट जीवनामुळे वादळात पडले आहेत. (३८) आणि तो त्यांच्या समोर त्यांच्या दुष्ट विचारांना आणि ज्या यातनांनी ते भोगायला लागतील त्या यातनांना उघड करील, ज्या ज्वालेसारख्या आहेत;

आणि तो त्यांना सहजपणे नष्ट करील त्या व्यवस्थेने जी माझ्यासारखी आहे.”

अश्शूर्यांना परमेश्वराच्या देवदूताने मारल्याचा अर्थ असा आहे की हे देवाचे वचन होते, ज्याने त्या माणसांना त्यांच्या पापांची खात्री पटवली. ते त्यांच्या वर प्रचंड वादळासारखे कोसळले, आणि त्यांनी पश्चात्ताप करण्यास नकार दिला म्हणून त्यांना वेदना झाल्या.

प्रकटीकरण १६:९-११ “माणसे कडक उन्हाने करपून गेली; तेव्हा त्या पीडांवर ज्याला अधिकार आहे त्या देवाच्या नावाची निंदा त्यांनी केली आणि देवाचा गौरव करण्यासाठी त्यांनी पश्चात्ताप केला नाही. पाचव्याने आपली वाटी श्वापदाच्या आसनावर ओतली, तेव्हा त्याचे राज्य ‘अंधकारमय झाले,’ आणि लोकांनी वेदनांमुळे आपल्या जिभा चावल्या; आणि आपल्या वेदनांमुळे व आपल्या फोडांमुळे त्यांनी ‘स्वर्गाच्या’ देवाची निंदा केली, आणि आपल्या कृत्यांबद्दल पश्चात्ताप केला नाही.”

ते “सहजपणे नष्ट झाले त्या व्यवस्थेने जी” देवाच्या स्वभावाचे प्रतिरूप आहे. हेच ती अग्नि नाही का ज्याने नादाब आणि अबीहू यांना भस्मसात केले, जी पवित्रस्थानातून बाहेर आली होती? जरी अग्नीने त्यांना भस्मसात केले, तरी त्यांना त्यांच्या वस्त्रांसह बाहेर नेले गेले.

लेवीय १०:२-५ “तेव्हा परमेश्वरासमोरून अग्नी निघाला व त्याने त्यांना भस्म केले; आणि ते परमेश्वरासमोर मरण पावले. ह्या बाबतीत मोशे अहरोनाला म्हणाला, “परमेश्वराने सांगितले ते हे : जे माझ्याजवळ येतील त्यांना मी पवित्र असल्याचे दिसून येईल आणि सर्व लोकांसमक्ष माझा गौरव होईल.” तेव्हा अहरोन चूप राहिला. मग अहरोनाचा चुलता उज्जीयेल ह्याचे मुलगे मीशाएल व एलसाफान ह्यांना मोशेने बोलावून सांगितले की, “तुम्ही इकडे येऊन तुमच्या बांधवांना पवित्रस्थानासमोरून उचलून छावणीबाहेर घेऊन जा.” मोशेने सांगितल्याप्रमाणे त्यांनी येऊन त्यांच्या अंगरख्यांसहित त्यांना उचलून छावणीबाहेर नेले.”

पुन्हा, आपल्याला हे समजते की हे “भस्म केले” म्हणजे पापाची खात्री असू शकते, कारण हा शब्द अशा प्रकारे वापरलेला आहे:

१ शमुवेल २४:५ “नंतर शौलाच्या झग्याचा काठ कापून घेतल्याबद्दल दाविदाचे मन त्याला खाऊ लागले.[H5221].”

२ शमुवेल २४:१० “प्रजेची मोजदाद केल्यावर दाविदाचे मन त्याला खाऊ लागले.[H5221] दावीद परमेश्वराला म्हणाला, “हे जे मी केले त्यात मी मोठे पाप केले आहे; तर हे परमेश्वरा, आपल्या सेवकाला दोषमुक्त कर, कारण मी मोठा मूर्खपणा केला आहे.”

हा तोच शब्द आहे जो २ राजे १९:३५ मध्ये वापरलेला आहे:

२ राजे १९:३५ “त्या रात्री असे झाले की परमेश्वराच्या देवदूताने जाऊन अश्शूरी गोटातले एक लक्ष पंचाऐंशी हजार लोक मारले;[H5221] पहाटेस लोक उठून पाहतात तर सर्व प्रेतेच प्रेते!”

म्हणून, “मारणे” हा शब्द नक्कीच पापाची खात्री या अर्थाने वापरला जाऊ शकतो.

## हेरोदाचा मृत्यू

आपल्या यादीतील शेवटची कथा म्हणजे हेरोदाचा मृत्यू.

प्रेषितांचीं कृत्यें १२:२३ “त्याने देवाचा गौरव केला नाही, म्हणून तत्क्षणी प्रभूच्या दूताने त्याच्यावर प्रहार केला आणि तो किडे पडून मेला.”

तोच देवदूत जो पेत्राला सोडविण्यासाठी राजदरबारातून आला होता, तोच हेरोदासाठी क्रोध आणि न्यायाचा संदेशवाहक ठरला. देवदूताने पेत्राला झोपेतून उठवण्यासाठी मारले, पण त्या दुष्ट राजाला वेगळ्या प्रकारे मारले त्याचा अभिमान खाली आणला आणि त्याच्यावर सर्वशक्तिमानाचा न्याय आणला. हेरोदाने मन आणि शरीर या दोन्हींत भयंकर वेदना सहन करत देवाच्या प्रतिशोधात्मक न्यायाखाली प्राण सोडला. {AA 152.1}

आपल्या मागील उदाहरणांवरून ही कथा समजावणे सोपे आहे. हेरोदाने व्यवस्था मोडली आणि चिरंतन करार तोडला. देवाच्या वचनाने त्याच्या पापी वर्तनाविषयी त्याला खोल खात्री दिली, जेणेकरून त्याने पश्चात्ताप करावा. त्या खात्रीमुळे त्याला त्रास झाला, पण त्याने पश्चात्ताप करण्यास नकार दिला. आणि त्यामुळे सैतानाला त्याला आजाराने मारण्याची संधी मिळाली.

“सैतान आपले सामर्थ्य वापरत आहे. तो पिकलेले पीक उध्वस्त करतो, आणि दुष्काळ व क्लेश मागोमाग येतात. तो हवेत घातक विष सोडतो, आणि हजारो लोक रोगराईने मरतात. या आपत्ती अधिकाधिक वारंवार व भयंकर होत जातील. नाश माणसावर आणि प्राण्यांवर दोघांवरही येईल. ‘पृथ्वी शोक करते व कोमेजते,’ ‘गर्विष्ठ लोक … कृश होतात. पृथ्वी शोकाकुल व कृश झाली आहे; जग झुरून कृश झाले आहे; पृथ्वीवरील प्रतिष्ठित जन जर्जर झाले आहेत. पृथ्वी आपल्या रहिवाशांकडून भ्रष्ट झाली आहे, कारण त्यांनी नियमांचे उल्लंघन केले आहे, विधींचे अतिक्रमण केले आहे आणि सनातन करार मोडला आहे.” यशया २४:४-५; {GC 589.3}

हेरोद शत्रूकडे सोपविला गेला कारण त्याने करार तोडला.

लेवीय २६:२५ “मी तुमच्यावर तलवार आणीन, ती करार मोडल्याचा बदला घेईल; तुम्ही आपापल्या नगरात जमा व्हाल, तेव्हा मी तुमच्यावर मरी पाठवीन; मी तुम्हांला तुमच्या शत्रूच्या स्वाधीन करीन.”

ख्रिस्ताने हेरोदावर आपल्या वचनाची तलवार आणली. हेरोदाने पश्चात्ताप न केल्यामुळे त्याला शत्रूकडे सोपवले गेले, ज्याने त्याच्यावर रोगराई आणली.

मग हेरोदाने अनुभवलेला “घाव” पेत्राच्या तुलनेत वेगळा कसा होता? कारण पेत्राचे अंतःकरण स्वच्छ होते, पण हेरोदाचे नव्हते. जेव्हा पेत्र जागा झाला, तेव्हा देवदूताच्या उपस्थितीत त्याला भीती वाटली नाही. पण हेरोदाचा अनुभव अगदी वेगळा होता. त्याच्यासाठी ते मेघगर्जनासारखे वाटले.

योहान १२:२८-२९ “हे बापा, तू आपल्या नावाचा गौरव कर.” तेव्हा अशी आकाशवाणी झाली की, “मी ते गौरवले आहे आणि पुन्हाही गौरवीन.” तेव्हा जे लोक उभे राहून ऐकत होते ते म्हणाले, “मेघगर्जना झाली.” दुसरे म्हणाले, “त्याच्याबरोबर देवदूत बोलला.’”

ज्या “मारण्याचा” अनुभव एखाद्यासाठी कोमल, सौम्य आवाजासारखा असू शकला असता, तोच अनुभव हेरोदासाठी मेघगर्जना सारखा झाला आणि त्याला मृत्यूपर्यंत भीतीने घेरले. जे लोक अजूनही असे मानतात की परमेश्वराच्या देवदूताने हेरोदावर प्राणघातक शक्ती वापरली, त्यांनी मग प्रेरणेतील इतर सर्व उतारे एकत्र आणून एकसंध करावे, आणि येशूचा स्वभाव जो आपला परिपूर्ण आदर्श आहे याचे रक्षण करावे, तसेच हे दाखवून द्यावे की प्राणघातक शक्तीचा वापर या विधानाशी सुसंगत आहे:

“शक्तीचा वापर हा देवाच्या राज्याच्या तत्त्वांविरुद्ध आहे; त्याला फक्त प्रेमाची सेवा हवी आहे; आणि प्रेमाला आज्ञा देता येत नाही; ते बलाने किंवा अधिकाराने जिंकता येत नाही. फक्त प्रेमानेच प्रेम जागृत होते.” {DA 22}

हा आरोप केला जातो की आपण बायबलचे आध्यात्मिकीकरण करत आहोत. त्यावर उत्तर असे आहे की आपण प्रेरणा जे काही आपल्याशी बोलते ते सर्व एकत्र घेतो आणि ख्रिस्तामध्ये प्रकट झालेल्या देवाच्या स्वभावाशी सुसंगत असा निष्कर्ष काढतो. सुसंगत राहण्यासाठी, जे लोक शास्त्राचा शब्दशः अर्थ लावण्यावर आग्रह धरतात, त्यांनी मग हे मान्य केले पाहिजे की देव लोकांना त्रास देण्यासाठी वाईट आत्मे पाठवतो (जसे शौलाच्या बाबतीत झाले), किंवा देव वाईट देवदूतांना आपल्यासाठी कामाला लावतो (जसे स्तोत्र ७८:४९ मध्ये लिहिले आहे), किंवा खोटे आत्मे पाठवून अहाबाचा मृत्यू घडवतो (१ राजे २२:२२). आपण यात हेही जोडू शकतो की अशा प्रकारचे वाचन हे दाखवते की

देव लोकांची अंतःकरणे कठोर करतो आणि त्यांना बलवान भ्रामकतेकडे पाठवतो. मग शास्त्र वाचण्याची हीच सर्वोत्तम पद्धत आहे काय?

आपण पाहतो की जेव्हा देवदूत लोकांना मारतो आणि त्यांचा मृत्यू होतो, तेव्हा प्रत्यक्षात ते देवाचे वचन असते जे त्यांना पापाची खात्री पटवते. स्वतःच्या पापीपणामुळे होणारी यातना क्लेश निर्माण करते. आणि रोगराईची उपस्थिती हे दाखवते की देवाचा आत्मा मागे हटला आहे आणि नाश करणाऱ्याने आपले कार्य केले आहे, कारण देवाने पश्चात्ताप करण्यास नकार देणाऱ्यांचे संरक्षण करणे थांबवले आहे. पापच पापाला शिक्षा करते. देवाचे देवदूत येशूच्या आत्म्याने भरलेले आहेत. ते पित्याच्या आज्ञा पाळतात आणि ते शारीरिक तलवार चालवत नाहीत. ते देवाच्या वचनात बलवान आहेत आणि येशूच्या धार्मिकतेने परिपूर्ण आहेत. त्यांची पवित्रता, त्यांचे प्रेम आणि त्यांची शुद्धता हे पाप्यांच्या दुष्टतेसाठी भयप्रद असतात, आणि त्यांच्या पवित्रतेमुळे अधार्मिकांच्या अंतःकरणात भीती निर्माण होते. त्यांची पवित्रता हे त्यांचे मुख्य सामर्थ्य आहे; तरीसुद्धा त्यांच्याकडे दुष्टाच्या शक्तींना आवर घालण्याचे सामर्थ्यही आहे.

“मी माझ्यासोबत असलेल्या देवदूताला विचारले की मी काय ऐकले त्याचा अर्थ काय आहे, आणि हे चार देवदूत काय करणार आहेत. त्याने मला सांगितले की हा देव आहे जो या शक्तींना आवर घालतो, आणि त्याने आपल्या देवदूतांना पृथ्वीवरील गोष्टींवर देखरेख करण्याची जबाबदारी दिली आहे; आणि या चार देवदूतांना देवाकडून वारे आवरण्याचे सामर्थ्य दिले आहे, आणि ते त्यांना सोडणार होते.” {EW 38}

म्हणून धर्मी देवदूतांकडे प्रचंड सामर्थ्य आहे. जेव्हा त्यांना आपले हात सोडण्याची आज्ञा मिळते, तेव्हा ते सैतानाच्या रोषाची संपूर्ण शक्ती मुक्त करू शकतात. जरी त्यांना हे करायचे नसेल, तरी आज्ञा मिळाल्यावर ते करतात. हे फक्त तेव्हाच घडते जेव्हा एखादी व्यक्ती देवाचा इशारा ऐकण्यास नकार देते आणि त्याच्या आज्ञा मोडण्यातच टिकून राहते. दीर्घकाळ संयमानंतर अखेरीस

देवाचा आत्मा मागे हटतो आणि त्या पाप्याला त्याने निवडलेल्या स्वामीकडे सोपवतो.

## चांगल्या आणि वाईट देवदूतांची विध्वंसक शक्ती

आणखी एक विधान आहे ज्याचा आपण विचार करायला हवा.

“एका एकमेव देवदूताने मिसरमधील सर्व प्रथम जन्मलेल्याना नष्ट केले आणि त्या देशात शोक भरला. जेव्हा दावीदाने लोकांची गणना करून देवाविरुद्ध अपराध केला, तेव्हा तो एक देवदूत त्या भयंकर नाशाला कारणीभूत ठरला ज्यामुळे त्याच्या पापाला शिक्षा मिळाली. पवित्र देवदूत जेव्हा देव आज्ञा करतो तेव्हा ज्या नाशक शक्तीचा उपयोग करतात, त्याच नाशक शक्तीचा उपयोग दुष्ट देवदूत करतील जेव्हा देव त्यांना परवानगी देतो. आता काही शक्ती तयार आहेत आणि फक्त दैवी परवानगीची वाट पाहत आहेत, सर्वत्र उध्वस्तता पसरवण्यासाठी.” {GC 614.2}

या उताऱ्याचे पृष्ठभागी वाचन असे सूचित करते की मिसरमधील जेष्ठ पुत्रांचा नाश आणि दावीदाने लोकांची गणना केली तेव्हा इस्राएलमध्ये झालेला नाश हे पवित्र देवदूतांनी केले. पण जर आपण हा उतारा अधिक काळजीपूर्वक व संदर्भासह वाचला, तर वेगळीच गोष्ट समोर येते.

सर्वप्रथम आपण या परिच्छेदाची रचना लक्षात घेतली पाहिजे. येथे नाशाची दोन उदाहरणे दिली आहेत:

१. मिसरमधील जेष्ठ पुत्रांचा नाश.

२. दावीदाच्या पापामुळे इस्राएलमध्ये झालेला नाश.

यानंतर नाशक शक्तीचा उल्लेख केला आहे. पवित्र देवदूत देव आज्ञा करतो

तेव्हा ज्या नाशक शक्तीचा उपयोग करतात, त्याच नाशक शक्तीचा उपयोग दुष्ट देवदूत करतील जेव्हा देव परवानगी देतो. जर या दोन नाशाच्या उदाहरणांना “पवित्र देवदूतांशी” जोडायचे असेल, तर वाक्यरचनेची क्रमवारी उलट असायला हवी होती. मग ते असे वाचले गेले असते:

“एका एकमेव देवदूताने मिसरमधील सर्व प्रथम जन्मलेले नष्ट केले आणि त्या देशात शोक भरला. जेव्हा दावीदाने लोकांची गणना करून देवाविरुद्ध अपराध केला, तेव्हा एक देवदूत त्या भयंकर नाशाला कारणीभूत ठरला ज्यामुळे त्याच्या पापाला शिक्षा मिळाली. दुष्ट देवदूत ज्या नाशक शक्तीचा उपयोग करतात जेव्हा देव परवानगी देतो, त्याच नाशक शक्तीचा उपयोग पवित्र देवदूत करतील जेव्हा देव आज्ञा करतो. आता काही शक्ती तयार आहेत आणि फक्त दैवी आज्ञेची वाट पाहत आहेत, सर्वत्र उध्वस्तता पसरवण्यासाठी.” {GC 614.2 adapted}

ही गोष्ट विशेष लक्ष देण्यासारखी आहे की एलेन व्हाइट प्रथम पवित्र देवदूतांच्या शक्तीचा उल्लेख करते आणि नंतर दुष्ट देवदूतांच्या नाशक कार्याचे स्पष्टीकरण देते.

## संदर्भात वाचन

जेव्हा आपण हा उतारा मागील परिच्छेदाच्या संदर्भात वाचतो, तेव्हा तो पूर्णपणे अर्थपूर्ण ठरतो.

“जेव्हा तो [ख्रिस्त] पवित्रस्थान सोडतो, तेव्हा पृथ्वीवरील रहिवाशांवर अंधकार पसरतो. त्या भयानक काळात धार्मिकांना मध्यस्थाविना पवित्र देवाच्या दृष्टीसमोर जगावे लागेल. जो आवर दुष्टांवर ठेवण्यात आला होता तो काढून टाकला जातो, आणि शेवटपर्यंत हट्टी राहणाऱ्यांवर सैतानाचा संपूर्ण ताबा येतो. देवाचे दीर्घ संयम संपले आहे. जगाने त्याच्या दयेचा नकार केला आहे, त्याच्या प्रेमाचा तिरस्कार केला आहे आणि त्याच्या नियमशास्त्राला तुडवले

आहे. दुष्टांनी आपल्या परीक्षेच्या कालावधीची सीमा ओलांडली आहे; देवाचा आत्मा, जो सतत नाकारला गेला होता, अखेरीस मागे घेतला गेला आहे. दैवी कृपेने न झाकलेले, त्यांना दुष्टापासून कोणतेही संरक्षण नाही. मग सैतान पृथ्वीवरील रहिवाशांना एका महान, अंतिम संकटात ढकलून देईल. देवाचे देवदूत मानवी आवेशांच्या उग्र वार्यांना आवर घालणे थांबवतात तेव्हा, वादाच्या सर्व घटकांना मोकळे केले जाईल. संपूर्ण जगाचा नाश त्या जुन्या यरुशलेमवर आलेल्या नाशापेक्षा अधिक भयंकर असेल." {GC 614.1}

"एका एकमेव देवदूताने मिसरमधील सर्व प्रथम जन्मलेल्याना नष्ट केले आणि त्या देशात शोक भरला. जेव्हा दावीदाने लोकांची गणना करून देवाविरुद्ध अपराध केला, तेव्हा एक देवदूत त्या भयंकर नाशाला कारणीभूत ठरला ज्यामुळे त्याच्या पापाला शिक्षा मिळाली. पवित्र देवदूत जेव्हा देव आज्ञा करतो तेव्हा ज्या नाशक शक्तीचा उपयोग करतात, त्याच नाशक शक्तीचा उपयोग दुष्ट देवदूत करतील जेव्हा देव परवानगी देतो. आता काही शक्ती तयार आहेत आणि फक्त दैवी परवानगीची वाट पाहत आहेत, सर्वत्र उध्वस्तता पसरवण्यासाठी." {GC 614.2}

मागील परिच्छेद आपल्याला एलेन व्हाइट काय सांगत आहेत याचा संदर्भ देतो:

१. जेव्हा ख्रिस्त पवित्रस्थान सोडतो.

२. दुष्टांवर ठेवलेला आवर काढला जातो, आणि सैतानाचा त्यांच्यावर संपूर्ण ताबा येतो.

३. देवाचा आत्मा, जो सतत नाकारला गेला होता, अखेरीस मागे घेतला जातो.

४. दैवी कृपेने न झाकलेले, त्यांना दुष्टापासून कोणतेही संरक्षण नसते.

५. देवाचे देवदूत मानवी आवेशांच्या उग्र वार्यांना आवर घालणे थांबवतात, आणि वादाचे सर्व घटक मोकळे केले जातात.

संपूर्ण परिच्छेद देव आपले संरक्षण मागे घेतो आणि सैतानाला त्याचे नाशक

कार्य करू देतो याविषयी बोलतो. म्हणूनच GC 614.1 मध्ये उल्लेख केलेले नाशाचे कार्य म्हणजे देवाने सैतानाला नाश करू देणे, त्या लोकांचा जे देवाचे आवाहन ऐकायला नकार देतात आणि बंडखोरीतच टिकून राहतात. मग जेव्हा आपण GC 614.2 मधील पुढील दोन उदाहरणे वाचतो-q

“एका एकमेव देवदूताने मिसरमधील सर्व प्रथम जन्मलेले नष्ट केले आणि त्या देशात शोक भरला. जेव्हा दावीदाने लोकांची गणना करून देवाविरुद्ध अपराध केला, तेव्हा एक देवदूत त्या भयंकर नाशाला कारणीभूत ठरला ज्यामुळे त्याच्या पापाला शिक्षा मिळाली.” {GC 614.2}

तेव्हा हे स्पष्ट होते की नाशाचे कार्य सैतान व त्याचे देवदूत यांनी केले. जर आपण असे मानले की प्रथम जन्मलेल्यांना पवित्र देवदूतांनी मारले आणि दावीदाने लोकांची गणना केली म्हणून काही इस्राएलींना ठार मारले, तर मग या उताऱ्याचे शेवटचे वाक्य विसंगत ठरते:

“आता काही शक्ती तयार आहेत आणि फक्त दैवी परवानगीची वाट पाहत आहेत, सर्वत्र उध्वस्तता पसरवण्यासाठी.” {GC 614.2}

येथे “दैवी परवानगी” हा शब्दप्रयोग अगदी “दुष्ट देवदूत जेव्हा देव परवानगी देतो” या वाक्याशी सुसंगत आहे, आणि त्यामुळे पहिल्या व दुसऱ्या परिच्छेदातील विचाराचा निष्कर्ष पूर्ण होतो म्हणजे दुष्ट देवदूत लोकांना नष्ट करतात, जे देवाच्या आवाहनांकडे लक्ष देण्यास नकार देतात.

## मिसरमध्ये प्रथम जन्मलेल्यांचा नाश करणारा सैतान

मिसरमधील जेष्ठ पुत्रांबाबत आपल्याला सांगितले आहे की हे कार्य कोणी केले:

“मिसरमध्ये जेष्ठ पुत्र ठार होण्यापूर्वी, परमेश्वराने इस्राएली लोकांना आज्ञा केली की त्यांनी आपली मुले आपल्याबरोबर घरात जमवावी, आणि दाराच्या कपाटावर व दोन उंबरठ्यांवर रक्त लावावे, जेणेकरून जेव्हा नाश करणारा देवदूत देशातून जाईल तेव्हा तो अशा खूण केलेल्या घरांना ख्रिस्ताच्या अनुयायांचे निवासस्थान म्हणून ओळखेल आणि त्यांना वगळून जाईल.

आज आपण आपल्या मुलांना आपल्याभोवती जमवले पाहिजे, जर आपण त्यांना दुष्टाच्या नाशक शक्तीपासून वाचवू इच्छितो. ख्रिस्त आणि सैतान यांच्यातील संघर्ष या पृथ्वीच्या इतिहासाच्या शेवटापर्यंत तीव्रतेत वाढत जाईल. आपल्याला ख्रिस्ताच्या रक्तावर विश्वास ठेवायला हवा, जेणेकरून आपण आपल्या समोर असलेल्या संकटाच्या काळातून सुरक्षितपणे जाऊ शकू.” {2SAT 199}

येशू दार ठोठावतो; तुम्ही त्याच्यासाठी दार उघडाल काय? तो तुमच्या उंबरठ्यावर, सर्व पापांपासून शुद्ध करणाऱ्या आपल्या रक्ताच्या जागी, अशी शिक्षा लिहिण्यास भाग पाडला जाईल का जी शिक्षा तुम्हाला नाश करणाऱ्या देवदूतांच्या ताब्यात सोडते? “तो आपल्या मूर्तींसोबत जोडलेला आहे.” रक्षक देवदूतांनो, “त्याला एकटे सोडा.” [होशे ४:१७] “मी किती वेळा तुझी मुले माझ्या पंखाखाली कोंबडी जशी पिल्लांना एकत्र करते तसे एकत्र करण्याचा प्रयत्न केला, पण तुम्ही नकार दिला.” [मत्तय २३:३७] जे सर्व दार उघडतील, त्यांच्यात येशू प्रवेश करतो आणि अधिकार घेतो. तुम्ही असे म्हणणार नाही का, “या आत, हे परमेश्वराने आशीर्वाद दिलेल्या; या आत; बाहेर का उभा आहेस?” [उत्पत्ती २४:३१] {Lt30a-1892.29}

मग पवित्र देवदूत कोणती नाशक शक्ती वापरतात? जसे आपण पूर्वी मंदिर शुद्धीकरणाच्या प्रसंगी पाहिले, येशूने निर्जीव वस्तूंवर शक्ती वापरली होती.

“माणसे अजूनही महागड्या इमारती उभारतील, ज्यांचा खर्च लाखो रुपयांचा असेल; त्यांच्या वास्तुशिल्प सौंदर्याकडे आणि बांधकामातील भक्कमपणाकडे व टिकाऊपणाकडे विशेष लक्ष दिले जाईल; पण परमेश्वराने मला दाखवले आहे की, जरी त्या असामान्य भक्कमपणे आणि महागड्या सजावटीने बांधल्या गेल्या तरी या इमारती यरुशलेमच्या मंदिरासारखेच नष्ट होतील. त्या भव्य रचनेचा नाश झाला. देवाचे देवदूत नाशाचे कार्य करण्यासाठी पाठवले गेले, त्यामुळे एकही दगड दुसऱ्यावर राहिला नाही, जो खाली फेकला गेला नाही.” (MS 35, 1906; 5BC 1098)

जेव्हा यरीहोचा नाश झाला, तेव्हा शहराच्या भिंतींना मानवी हाताने स्पर्शही केला नाही, कारण परमेश्वराच्या देवदूतांनी त्या तटबंदी कोसळवली आणि शत्रूच्या गढमध्ये प्रवेश केला. {RH, जुलै १९, १८९२}

पाहा, देवदूतांनी योनाथान आणि त्याच्या शस्त्रवाहकाला कशी मदत केली:

“स्वर्गातील देवदूतांनी योनाथान आणि त्याच्या सहकाऱ्याला आच्छादले, देवदूत त्यांच्या सोबत लढले, आणि पलिष्ट्य त्यांच्यासमोर पडले. पृथ्वी हादरली, जणू घोडेस्वार आणि रथांसह एक मोठा समुदाय येत आहे. योनाथानाने दैवी सहाय्याची चिन्हे ओळखली, आणि अगदी पलिष्ट्यांनाही ठाऊक झाले की देव इस्राएलच्या सुटकेसाठी कार्य करीत आहे.” {PP 625}

मग पवित्र देवदूतांनी योनाथानासोबत कसे लढले त्यांनी योनाथान आणि त्याच्या शस्त्रवाहकाचे रक्षण केले. मग पवित्र देवदूतांनी मिसरकरांविरुद्ध नाशक शक्ती कशी वापरली?

निर्गम १४:२५ “त्याने त्यांच्या रथांची चाके काढून ते चालवणे कठीण केले; तेव्हा मिसरी लोक म्हणू लागले, “आपण इस्राएलांपासून पळून जाऊ, कारण परमेश्वर त्यांच्या बाजूने मिसऱ्यांशी लढत आहे.’”

जर पवित्र देवदूतांनी माणसांना मारण्यासाठी नाशक शक्ती वापरली असती, तर त्यांनी मिसरकरांच्या रथांची चाके का काढली? त्यांनी थेट त्यांना चिरडून का टाकले नाही? पुरावा स्पष्ट आहे, ज्यांच्याकडे ऐकण्याचे कान आहेत आणि

जे प्रामाणिकपणे हे उतारे वाचतात त्यांच्यासाठी. कोणताही मनुष्य फसवू नये जेव्हा ग्रेट काँट्रोव्हर्सी पृ. ६१४.२ मधील हा उतारा वापरला जातो. हा संदर्भाबाहेर घेतला जातो, जेणेकरून देवाच्या आज्ञा पाळणाऱ्या पवित्र देवदूतांना मानवी दृष्टिकोनानुसार व समजुतीनुसार खूनी दाखवले जाते. जर देवदूत रथांची चाके काढून त्यांना मंदावण्यासाठी प्रयत्न करत होते, तर कदाचित ते सैनिकांना नाश टाळण्यासाठी मागे फिरावे असे सुचवण्याचा प्रयत्न करत होते काय?

## यरीहोच्या भिंती

आपण वर पाहिले की यरीहोच्या भिंती कोसळवण्याबद्दल देवदूतांबद्दल एक उदाहरण आहे. देवदूतांनी या भिंती कोसळवल्या म्हणून त्या भिंतींवर लोक होते आणि भिंती कोसळल्यामुळे ते मारले गेले, असे गृहीत धरण्याचा मोह होतो. खालील उदाहरणे कधीकधी या कल्पनेला आधार देण्यासाठी वापरली जातात:

यरीहोचे शहर अत्यंत विलासी मूर्तिपूजेला समर्पित होते. तेथील रहिवासी फार श्रीमंत होते, पण देवाने त्यांना दिलेल्या सर्व संपत्तीला त्यांनी त्यांच्या देवतांची भेट मानली. त्यांच्याकडे सोनं आणि चांदी विपुल प्रमाणात होते; पण महाप्रलयापूर्वीच्या लोकांप्रमाणेच ते भ्रष्ट आणि निंदक होते, आणि त्यांच्या दुष्ट कृत्यांनी त्यांनी स्वर्गातील देवाचा अपमान व संताप केला. यरीहोविरुद्ध देवाचा न्याय जागृत झाला. ते एक गढ होते. परंतु परमेश्वराच्या सेनेचा कर्णधार स्वतः स्वर्गातून त्या शहरावर हल्ला करण्यासाठी स्वर्गीय सैन्याचे नेतृत्व करण्यास आला. देवदूतांनी त्या प्रचंड भिंतींना हात लावला आणि त्या जमिनीवर आणल्या. (3T 264.1)

पण ही कल्पना चुकीची आहे, कारण आपण पुढीलही वाचतो:

“देवदूत स्वर्गीय दरबारातून नाश करण्यासाठी नाही, तर संकटात सापडलेल्या आत्म्यांवर लक्ष ठेवण्यासाठी, हरवलेल्यांना वाचवण्यासाठी, भटकलेल्या

लोकांना पुन्हा कळपात आणण्यासाठी पाठवले जातात.” (RH 10 मे, 1906)

बायबल आपल्याला स्पष्टपणे सांगते की यरीहोतील लोकांना कोणी ठार मारले:

यहोशवा 6:20-21 “तेव्हा लोकांनी जयघोष केला आणि रणशिंगे वाजत राहिली. रणशिंगांचा आवाज ऐकताच लोकांनी मोठ्याने जयघोष केला आणि तट जागच्या जागी कोसळला; लगेच लोकांनी आपापल्यासमोर त्या नगरात सरळ चालून जाऊन ते हस्तगत केले. त्या नगरातील पुरुष, स्त्रिया, तरुण, वृद्ध, गुरेमेंढरे, गाढवे वगैरे सर्वांचा त्यांनी तलवारीने समूळ नाश केला.”

शास्त्र सांगते की यहोशवा आणि त्याची सेना ह्यांनी शहरातील सर्वांचा वध केला. यात असं म्हटलं नाही की देवदूतांनी आधी अनेकांना मारून उरलेल्यांना यहोशवा व त्याच्या सैन्याने ठार मारलं. ही कथने आपल्या गृहीतकांची परीक्षा घेण्यासाठी लिहिलेली आहेत आणि आपण तपशीलांकडे बारकाईने लक्ष देतो आहोत का ते पाहण्यासाठी आहेत. शहराच्या भिंती कोसळवणे हा निश्चितच शहरावरील हल्ला होता; पण बायबल हे स्पष्टपणे सांगत नाही तोवर ख्रिस्त व देवदूतांनी लोकांना मारण्यासाठी बळाचा वापर केला, असे आपण गृहीत धरू नये.

हे विषय तुम्ही मनापासून लक्षपूर्वक विचारात घ्यावे, ही माझी मनापासून प्रार्थना आहे. तुमचा संरक्षक देवदूत तुमचा वेळ झाला की स्वतःला तुमचा वैयक्तिक नाशक बनवतो, असा नाही. येशूप्रमाणे ते आपल्यावर प्रेम करतात आणि आपल्याला वाचवण्यासाठी जे काही शक्य आहे ते करतात. देवदूतांविषयी मला जे अनेक गोष्टींमध्ये अचंबित करते ते हे आहे.

महिमायुक्त देवदूतांना प्रेम देणे यातच त्यांचा आनंद आहे, आणि पडलेल्या व अपवित्र आत्म्यांवर अखंड जागरूक लक्ष ठेवणे. स्वर्गीय प्राणी मानवी अंत:करणांना आकृष्ट करतात; ते या अंध:कारमय जगात वरच्या दरबारातून प्रकाश आणतात; कोमल व संयमी सेवेद्वारे ते मानवी आत्म्यावर परिणाम

घडवतात, हरवलेल्यांना ख्रिस्ताशी अशा सहवासात आणण्यासाठी, जो त्यांच्या स्वतःच्या अनुभवापेक्षाही अधिक जवळचा असतो. (DA 21.1)

पवित्र देवदूतांची सेवा संयमी आणि कोमल असते, हिंस्र व विध्वंसक नव्हे. त्यांना आज्ञा दिल्यास ते निर्जीव वस्तू हलवण्यासाठी बळ वापरतात, परंतु ज्यांच्यासाठी ख्रिस्त मरण पावला त्या मानवांवर ते प्राणघातक बलाचा वापर करत नाहीत, कारण देवाचे राज्य बळाने चालत नाही. केवळ प्रेमानेच प्रेम जागृत होते. हे खरे आहे की एखाद्याचे रक्षण थांबवण्याची आज्ञा मिळाली तर ते ती पाळतील. एखाद्या देवदूतासाठी ते किती कठीण असेल याची कल्पना करा! त्यांनी ज्याचे दशकानुदशके रक्षण केले आहे, त्याला ते कोमलतेने प्रकाशाकडे वळवण्याचा प्रयत्न करत आले आहेत, आणि अखेरीस त्यांना हे शब्द ऐकावे लागतात: “मी जे काही करू शकलो ते सर्व केले, पण त्यांनी मला पूर्णपणे नाकारले आहे. त्यांना त्यांच्या इच्छेनुसार राहू द्या, आणि त्यांचे रक्षण करण्यापासून माघार घ्या.” आपल्या स्वामीशी निष्ठावान राहून, अनेक वर्षांच्या सतर्क सेवेनंतर, ते न डगमगता ही आज्ञा पाळतात. त्यांची सेवा किती दु:खद असेल, तरी ते किती विश्वासू असतील!

“तेव्हा परमेश्वराने त्या तरुणाचे डोळे उघडले, आणि त्याने पाहिले; पाहा, डोंगर आणि अलीशाभोवती अग्नीचे घोडे व रथ यांनी भरलेला होता.” (2 राजे 6:17)

देवाच्या सेवक आणि शस्त्रांनी सज्ज शत्रू यांच्या मधोमध स्वर्गीय देवदूतांची वेढा घालणारी सेना होती. ते महान सामर्थ्याने खाली आले होते नाश करण्यासाठी नव्हे, आदर-पूजा मागण्यासाठी नव्हे, तर दुर्बल व असहाय्य प्रभूच्या लोकांच्या भोवती तळ ठोकण्यासाठी आणि त्यांची सेवा करण्यासाठी. (PK 256.4)

देवदूत पृथ्वीवर येतात ते दोष देण्यासाठी आणि नाश करण्यासाठी नाही, राज्य करण्यासाठी आणि उपासना मागण्यासाठी नाही; तर ते दयाळू संदेशवाहक म्हणून येतात परमेश्वराच्या सेनेच्या कर्णधाराबरोबर सहकार्य करण्यासाठी, आणि मानवी सेवकांसोबत सहकार्य करण्यासाठी, जे हरवलेल्या मेंढ्यांचा शोध घेऊन त्यांना वाचवण्यासाठी पुढे जातात. देवदूतांना आज्ञा आहे की ते देवाला

भिणारे आणि त्याच्यावर प्रेम करणाऱ्यांच्या भोवती तळ ठोकावेत. (ST, 20 नोव्हेंबर, 1893, परिच्छेद 3)

मी स्वर्गात माझ्या संरक्षक देवदूताशी बोलण्याची, आम्ही एकत्र अनुभवलेले प्रसंग त्यांच्याकडून ऐकण्याची, आणि त्यांनी मला कसे मदत केली, येशूकडे व देवाच्या वचनाकडे कसे निर्देश केले, हे जाणून घेण्याची उत्कंठेने वाट पाहतो आहे. धन्यवाद प्रभु येशू, माझ्या देवदूतासाठी जो माझ्यावर लक्ष ठेवतो आणि माझ्या कुटुंबाची काळजी घेणाऱ्या देवदूतांसाठी. आमच्या संरक्षणासाठी आणि चार वारे थांबवण्यासाठी तू सतत पित्यापुढे करीत असलेल्या मध्यस्थीसाठी आम्ही तुला फार काही देणे लागतो. ह्यासाठी आपण नेहमी कृतज्ञ राहू.

# प्रहार करणारे देवदूत

आपण अशा विधानांचा काय अर्थ लावावा?

“देवाच्या अधीन राहून देवदूत सर्वशक्तिमान आहेत. एका प्रसंगी, ख्रिस्ताच्या आज्ञेचे पालन करून, त्यांनी एका रात्री अश्शूर सैन्यातील एक लाख पंच्याऐंशी हजार माणसांचा वध केला.” (DA 702)

“तोच देवदूत जो राजदरबारातून पेत्राला सोडवण्यासाठी आला होता, तोच हेरोदसाठी क्रोध आणि न्यायाचा दूत झाला होता. पेत्राला झोपेतून उठवण्यासाठी देवदूताने त्याला उठवले; पण त्या दुष्ट राजाला त्याने वेगळ्या प्रकारे उठवले त्याच्या अभिमानाला खाली आणून सर्वशक्तिमान देवाचा न्याय त्याच्यावर आणला. हेरोद तीव्र मानसिक आणि शारीरिक यातनांनी मरून गेला, ते पण देवाच्या प्रतिशोधी न्यायाखाली.” (AA 152)

देवाचे पवित्र देवदूत खरंच लोकांना ठार मारतात काय? ख्रिस्त खरंच असे शब्द बोलतो का: “हे लोक आता मेले पाहिजेत, जा आणि त्यांना ठार करा”?
येशूने हा देवाच्या स्वभावाचा भाग या पृथ्वीवर आल्यावर लपवला काय? येशूने येथे असताना कधीही कुणाची फाशी केली नाही. जर लोकांना ठार मारणे हा त्याच्या स्वभावाचा भाग असेल, तर त्याने तो या पृथ्वीवर असताना का प्रगट केला नाही?

“कारण मनुष्याचा पुत्र मनुष्यांच्या जीवाचा नाश करायला नाही, तर त्यांना तारायला आला आहे.” मग ते दुसऱ्या गावाला गेले.” (लूक 9:56)

“येशूने त्याला म्हटले : “फिलिप्पा, मी इतका काळ तुमच्याजवळ असूनही तू मला ओळखत नाहीस काय? ज्याने मला पाहिले आहे त्याने पित्याला पाहिले आहे; तर ‘आम्हांला पिता दाखवा’ असे तू कसे म्हणतोस?’” (योहान 14:9)